दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ४८ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१४ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (दोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

एकनाथ शिंदे कोणत्या पदावर याला महत्त्व नाही, ते आता लोकनेते

शिवसेना आमदार शहाजीबापू पाटील यांचा दावा

मुंबई (वृत्तसंस्था)–भाजपच्या आमदारांच्या रेट्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले आहेत. मात्र, एकनाथ शिंदे हे आता कोणत्या खुर्च्यावर आहे त्याला इतिहासात महत्त्व राहिलेले नाही. जनतेच्या मनावर राज्य करणारे ते लोकनेते झाले असल्याचे शिवसेनेचे आमदार शहाजीबाबू पाटील यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले आहे. या पार्श्वभूमीवर शहाजीबाबू पाटील यांनी केलेले हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर एकनाथ शिंदे पुन्हा उपमुख्यमंत्री पद स्वीकारतील याबाबत शाशंकता व्यक्त केली जात होती. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास तयार नसल्याच्या बातम्या देखील समोर आल्या होत्या. मात्र, अखेर शपथविधीच्या दिवशी एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यामुळे या सर्व घडामोडी बाबत राज्यात चर्चा सुरू आहे. यातच शहाजीबापू पाटील यांनी एकनाथ शिंदे हे आता लोकनेते असल्याचा दावा केला आहे.



शहाजीबापू पाटील यांना मंत्रीपद मिळण्याची अपेक्षा

आगामी मंत्री मंडळामध्ये शहाजीबापू पाटील यांचा समावेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर देखील शहाजीबापू पाटील यांनी सुचक विधान केले आहे. पक्ष वाढीसाठी एकनाथ शिंदे आपल्यावर पक्ष पातळीवर किंवा शासकीय पातळीवरची मोठी जबाबदारी देतील. ती चांगल्या पद्धतीने पार पाडणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या संधीचा मी सोन करेल, असे देखील ते म्हणाले. मंत्रिमंडळ विस्तारामध्ये शहाजीबापू पाटील यांना मंत्रीपद मिळण्याची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी हे विधान केले आहे.

शहाजीबापू पाटील यांनी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील पलटवार केला आहे. संजय राऊत यांचे घर भूईसपाट झालेले आहे. त्यातील पत्र, विटा जे काही चांगले असतील, तर ते गोळा करा आणि तुमची झोपडी बांधा, अशा शब्दात त्यांनी संजय राऊत यांना खोचक सल्ला दिला आहे. संजय राऊतांनी शिवसेनेचे तुकडे करून टाकले आहेत. आता उरली सूरली ठाकरेंच्या शिवसेनेचे वाटोळ केल्याशिवाय ते गप्प बसत नाही, असे देखील शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. या माध्यमातून शहाजीबापू पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. बॅलेट पेपर मतदान घेतल्यानंतर मतमोजणीच्या दिवशी भाजपचे नेते देश सोडून पळून जातील, असे वक्तव्य राऊत यांनी केले होते. यावरून शहाजीबापूंनी राऊतांवर टीका केली आहे.संजय राऊत हा संध्याकाळी वेगवेगळी दिव्य स्वप्ने पाहणारा माणूस आहे. जे स्वप्न संध्याकाळी पाहतात ते सकाळी टीव्ही समोर सांगण्याची त्यांची सवय असल्याचे शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. अजित पवार यांनी शरदचंद्र पवार गटाचे पाच खासदार फोडले तरच त्यांना केंद्रात मंत्रीपद मिळेल, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. यावरून शहाजीबापू यांनी संजय राऊत यांना सुनावले आहे. अजित पवार यांना भाजपने कोणतीही अट घातली नाही, हे मी खात्रीने सांगू शकतो, असा दावा देखील त्यांनी केला आहे.विधानसभेला विरोधकांचा दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे त्यांना घराच्या बाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. मात्र घराच्या बाहेर पडण्यासाठी आणि राजकारण पुन्हा कसे पुढे जायचे, यासाठी त्यांनी शोधलेला मार्ग म्हणजे ईव्हीएम मशीनवरील आक्षेप असल्याचे शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. मात्र जनतेने विरोधकांना नाकारले असल्याचा दावा देखील शहाजी बापू पाटील यांनी केला आहे.

नागपुरात मंत्र्यांसाठी ४० बंगले सज्ज ठेवण्याच्या सूचना
मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होणार

नागपूर (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार पुन्हा एकदा स्थापन झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ देखील घेतली तसेच अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. आता मंत्रिमंडळाचा विस्तार देखील लवकरच होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तसेच हिवाळी अधिवेशन देखील सुरू होणार आहेत त्यामुळे नागपूर येथे मंत्र्यांसाठी ४० बंगले सज्ज ठेवण्याच्या सूचना देखील देण्यात आल्याचे समजते. हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी राज्यात मंत्रिमंडळ विस्तार करण्यात येणार असल्याचे समजते. यामुळे आता नागपूर येथे घडामोडींना वेग आला असल्याचे दिसत आहे. मंत्रिमंडळ विस्तार लक्षात घेत नागपूरमध्ये मंत्र्यांसाठी ४० बंगले सज्ज करून ठेवण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता संजय उपाध्याय यांनी याबद्दल माहिती दिली आहे.

उपविभागीय अभियंता संजय उपाध्याय यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, मंत्रिमंडळ विस्तार लक्षात घेता नागपूरमध्ये मंत्र्यांसाठी ४० बंगले सज्ज करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उद्यापर्यंत मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनात मंत्र्यांसाठी निवासाची व्यवस्था झाली आहे. मंत्र्यांच्या नावाच्या पाट्यांचे ढाचे तयार असल्याचे उपाध्याय यांनी सांगितले आहे.

पुढे संजय उपाध्याय यांनी सांगितले, उद्या मंत्र्यांच्या



नावांची यादी आली की बंगल्यांवर नेमप्लेट लावण्यात येईल. निवास समितीची आजच बैठक झाली. या बैठकीत मंत्र्यांसाठी बंगले तयार ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. रवी भवन परिसरात कॅबिनेट मंत्र्यांसाठी २४ बंगले सज्ज आहेत. तर नाग भवन परिसरात राज्य मंत्र्यांससाठी १६ बंगले सज्ज करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, सध्या महायुतीमधील कोणत्या नेत्यांना कोणते खाते मिळणार तसेच कोणाला मंत्रिपद मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांची शपथविधी पार पडली मात्र मंत्रिमंडळ विस्तार अद्याप झाला नसल्याने सर्वांनाच मंत्रिपद कोणाला मिळणार याची उत्सुकता लागून राहिली आहे.

महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार:मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा

मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्र राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याच्या अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बिकेसी,वांद्रे येथे १३ ते १५ डिसेंबर रोजी वर्ल्ड हिन्दू इकनॉमिक परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी वर्ल्ड हिन्दू इकनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमचे अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी.व्ही.मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र येणाऱ्या काळात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनोमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आधारित विकासाच्या तत्वावर आधारित विकास करण्याच्या वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत.पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्यात मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृती मध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो असे आहे. तर हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आहे भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताचा विकास हा मुंगीच्या पावलांनी सुरू आहे असं म्हटलं जायचं.भारताचे अर्थव्यवस्था ही जगात न टिकणारी आहे असा लोकांचा समज होता. मात्र आजच्या भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारी भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे.जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो ? पण देशातील उपलब्ध मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे चालला आहे. महाराष्ट्र राज्याला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी एक सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या सल्ल्याने महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा आम्ही अभ्यास केला. यावर आधारित महाराष्ट्र राज्याच्या विकासाची धोरण बनवले आहेत. विकासाची गती मध्ये जागतिक पातळीवरती महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे.

मला पदमुक्त करा, प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करा:नाना पटोले

मुंबई (वृत्तसंस्था)–काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या हाराकिरीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून आपल्याला पदमुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या प्रदेशाध्यक्षपदाला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून मला पदमुक्त करा, असे ते आपल्या पत्रात म्हणाल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेत काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागा मिळाल्या. त्यात काँग्रेसला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर आता काँग्रेसमध्ये या पराभवाची चिरफाड सुरू झाली आहे. त्यानुसार नाना पटोले यांनी शुक्रवारी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे आपल्याला पदमुक्त करण्याची मागणी केली आहे.मी मागील ४ वर्षांपासून काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष आहे. लोकसभा निवडणुकीत माझ्या नेतृत्वात राज्यात काँग्रेसला चांगले यश मिळाले. पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे मला आता सर्व जबाबदारीतून मुक्त करावे, असे नाना पटोले यांनी आपल्या पत्रात म्हटल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. नाना पटोले यांनी प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून नवा प्रदेशाध्यक्ष नियुक्त करण्याची विनंतीही आपल्या पत्राद्वारे केली आहे.



पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी महायुतीत रस्सीखेच

अजित पवार आणि चंद्रकांत पाटलांमध्ये सुप्त संघर्ष,दोन दादांपैकी कोण मारणार बाजी?

पुणे (वृत्तसंस्था)

पुण्याच्या पालकमंत्रीपदावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. पुण्याचे पालकमंत्रिपदासाठी दोन्ही नेते आग्रही असल्याने महायुतीमध्ये मंत्रिपदावरून मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्याकडे पुण्याचे पालकमंत्रिपद होते. आताच्या सरकारमध्ये देखील त्यांनाच मिळणार की भाजप चंद्रकांत पाटलांना पुण्याचे पालकमंत्री करणार याकडे सध्या लक्ष लागले आहे.२०१९ मध्ये अजित पवार महाविकास आघाडीमध्ये होते. त्यावेळी अजित पवार उपमुख्यमंत्री देखील होते आणि पुण्याचे पालकमंत्री देखील होते. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाविकास आघाडीचे सरकार गेले आणि महायुतीचे सरकार आले. यामुळे अजित पवारांकडे असलेले पुण्याचे पालकमंत्रिपद देखील गेले. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील बनले. त्यानंतर अजित पवारांनी देखील बंड करत पक्ष आपल्या नावावर करत महायुतीमध्ये सामील झाले.

अजित पवार महायुतीमध्ये आल्यावर त्यांनी पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रह केला आणि त्यांना पालकमंत्रिपद देण्यात आले. चंद्रकांत पाटलांना सोलापूरचे पालकमंत्रिपद देण्यात आले. जेव्हा चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री होते तेव्हा देखील अजित पवारांनी जिल्ह्याच्या प्रशासनावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच अजित पवार मूळ पुण्याचेच असल्याने त्यांचा पुण्यातील प्रशासनावर पूर्वीपासूनच दबदबा राहिला आहे.अजित पवार पुण्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, पुण्यातील राजकारण हे प्रामुख्याने सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांचे साखर कारखाने तसेच सहकारी संस्था आहेत. त्यामुळे पुण्याचे पालकमंत्री होणे हे अजित पवारांसाठी महत्त्वाचे आहे. अजित पवार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आमदारांना निधी देखील उपलब्ध करून देतात. मात्र, आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आहेत त्यामुळे पुण्याचे पालकमंत्रिपद कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील मिळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.



अटी शिथिल करून नगर-शिर्डी रस्त्याचे काम मंत्री नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती खा.लंके यांचा पाठपुरावा

पारनेर । प्रतिनिधी

नगर-शिर्डी रस्त्याचे अनेक वर्षांपासून रखडलेले काम आता अल्प निविदा प्रसिध्द करून अडीच हजार कोटी रूपये खर्चाचा हा प्रकल्प लवरच पुर्ण केला जाईल. हे काम पुर्ण होईपर्यत या रस्त्याची दुरूस्ती करून दळणवळण सुलभ केले जाईल अशी ग्वाही केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी दिली.

नगर-शिर्डी रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी खा. नीलेश लंके हे संसदेत गेल्यापासून मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. शुक्रवारी मंत्री गडकरी यांनी या प्रश्नावर संसदेत निवेदन केले. त्यावेळी त्यांनी हे काम लवकरात लवकर माग लावण्याची ग्वाही दिली. या रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे ही मागणी खा. लंके यांनी केली आहे. त्याचा उल्लेखही गडकरी यांनी आपल्या निवेदनात केला. गडकरी यांनी सांगितले की, नगर-शिर्डी रस्त्याचे नेमके काय झाले माहिती नाही, परंतू या रस्त्याच्या कामाच्या तिनदा निविदा निघाल्या. तीन ठेकेदार पळून गेले. एकाची बॅक गॅरंटी बनावट निघाली. आता पुन्हा दोनच ठेकेदारांनी निविदा भरल्या आहेत. अधिकाऱ्यांनी ही माहीती दिल्यानंतर या निविदा रद्द करण्यात सांगण्यात आले आहे. आता पंधरा दिवसांचे अल्प कालावधीची निविदा प्रसिध्द करून सुमारे अडीच हजार रूपये खर्चाचा हा प्रकल्प पुर्ण केला जाईल.

शिर्डीला भाविक येतात. त्यांना त्रास सहन करावा लागतो त्याचे मलाही दुःख होते आहे. तांत्रीक आणि आर्थिक निकष होते त्यात काही अंशी शिथिलता आणण्यात आली आहे. कारण आणखी ठेकेदार ही निविदा भरू शकतील. हा रस्ता काँक्रीटचा करण्याची मागणी तेथील लोकसभा सदस्यांनी केली आहे. त्याचा अभ्यास करून हे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल. तोपर्यंत खराब झालेल्या रस्त्याची दुरूस्ती करून तो वाहतूकीसाठी योग्य राहील याची काळजी घेण्यात येणार असल्याचे गडकरी म्हणाले.

रस्त्याची निविदा काढल्यानंतर निविदा रकमेच्या पन्नास टक्क्यांपर्यंत कमी त्या भरल्या जातात. हे थांबविण्यासाठी सरकारने काही उपाययोजना कराव्यात. त्यासाठी संबंधित ठेकेदार, अधिकारी यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे अशी मागणी यावेळी सभागृहात करण्यात आली, त्यावरही गडकरी यांनी उत्तर दिले.

पूर्वी मोठ-मोठी माणसे निविदा दाखल करत. त्यासाठीच आता तांत्रीक आणि आर्थिक बाबींमध्ये शिथीलता आणण्यात येत आहे. तसे केल्यामुळे आणखी काही लोक हे काम करू शकतील. ४२ टक्क्यांपासून ५० टक्क्यांपर्यंत कमी निविदा सादर करण्यात येत आहेत. हे थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असून त्यामुळे कामे दर्जेदार होण्यास मदत होईल. काही बंधने आम्ही चांगल्या होतून घातली होती. मात्र त्याला यश आले नसल्याचे गडकरी म्हणाले



तहसीलदार डॉ.क्षितीजा वाघमारे यांचे शेतरस्ता निर्मितीतील ऐतिहासिक योगदान

महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने सत्कार

पारनेर । प्रतिनिधी

तहसीलदार डॉ. क्षितीजा वाघमारे यांच्या कार्यामुळे प्रशासनाची विश्वासार्हता वाढली असून, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमात तहसीलदार वाघमारे यांनी सांगितले, शेतकरी हा केंद्रबिंदू असून, प्रत्येक शेतात रस्ता पोहोचवणे ही माझी जबाबदारी आहे. शेवटचा रस्ता पूर्ण होईपर्यंत थांबणार नाही. नागरिकांनी यामध्ये सहकार्य करावे.




तहसीलदारांनी ब्रिटिशकालीन शिव पानंद शेतरस्ते खुले करण्यासाठी विविध पातळ्यांवर ठोस पावले उचलली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, ग्रामस्तरीय समित्यांच्या माध्यमातून काम सुरू केले. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेत रस्ते उभारणीसाठी शासकीय परिपत्रक लागू केले.कार्यक्रमात उपस्थित महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी सांगितले, तहसीलदार वाघमारे यांनी आदर्श कार्य पद्धत तयार केली आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करत या ऐतिहासिक कामासाठी पाठबळ द्यावे.यावेळी दादासाहेब जंगले पाटील, राजेंद्र नागवडे, रविंद्र सानप बापू, ड. कडूस पाटील, सचिन शेळके यांसह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास भुमि अभिलेख कार्यालयाचे शिंगाडे , पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे, पंचायत समितीचे बनकर साहेब, तसेच विविध गावांतील शेतकरी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदारांच्या या पुढाकारामुळे श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

श्री दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन

राहुरी । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, दिंडोरी प्रणित राहुरी अध्यात्मिक केंद्राच्या वतीने श्री दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र पारायण व यज्ञ याग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आणि गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुरू असून, यात १००८ सेवेकरी सहभागी झाले आहेत.

सोहळ्यात सोमवारी ग्रामदेवता सन्मान व अग्नी स्थापन करून पारायणास प्रारंभ झाला. पुढील कार्यक्रमांत गीताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग आणि रविवारी दत्त जन्मोत्सव व बलि पूर्णहुतीचा समावेश आहे. सोमवारी सकाळी आरतीनंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.



पाथर्डीचे मुनीर शेख उर्फ मुन्नाभाई आता मोठ्या पडद्यावर

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डीचे सुपुत्र आणि आपल्या सहजसुंदर अभिनयाने लोकांच्या मनावर राज्य करणारे मुनीर शेख उर्फ मुन्नाभाई यांची मोठ्या पडद्यावर दमदार एन्ट्री होणार आहे. वाया गेलेली पिढी या आगामी चित्रपटात त्यांनी मुलाचे वडील ही महत्त्वाची भूमिका साकारली आहे.



मुन्नाभाई यांनी स्थानिक पातळीवर नाटकं, स्किट्स, आणि विविध कार्यक्रमांतून प्रेक्षकांना खळखळून हसवलं आहे. त्यांच्या नैसर्गिक अभिनयशैलीने आणि विनोदी संवादफेकीने लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतानाच, त्यांनी अनेकदा सामाजिक संदेशही दिला आहे. त्यांच्या कामातून लोकांना विनोदासह भावनिक स्पर्श जाणवतो, जो त्यांचा खास गुण आहे.वाया गेलेली पिढी हा चित्रपट आजच्या पिढीतील संघर्ष, पिढ्यांमधील दरी, आणि कौटुंबिक नात्यांवरील कथा मांडतो. या चित्रपटात मुन्नाभाई एका मध्यमवर्गीय वडिलांची भूमिका साकारत आहेत, जे आपल्या मुलाला योग्य मार्गावर आणण्यासाठी झगडत असतात. त्यांच्या साधेपणात भावनिक ताकद आणि हास्याचा मसाला असेल, अशी माहिती समोर आली आहे.मुन्नाभाईंच्या या पदार्पणामुळे स्थानिक कलावंतांमध्येही नवा उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. वाया गेलेली पिढी चित्रपटाचे ट्रेलर लवकरच प्रदर्शित होणार असून, त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या मनात नक्कीच ठसा उमटवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.पाथर्डीच्या मुन्नाभाईंची ही मोठी झेप त्यांच्या मेहनतीचा आणि नैसर्गिक कलागुणांचा विजय असल्याचं सर्वत्र चर्चिलं जात आहे.

आदर्श गाव मांजरसुंबा येथे गोरक्षनाथ मंदिरावर कलशारोहण मध्य प्रदेशचे ह.भ.प.त्यागी महाराज प्रमुख पाहुणे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथील श्री क्षेत्र चैतन्य गोरक्षनाथ मंदिरावर कलशारोहणाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मध्य प्रदेशचे ह.भ.प. त्यागी महाराज यांच्या हस्ते होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्याच्या तयारीसाठी प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला आमदार शिवाजीराव कर्डिले, सरपंच अर्जुन कदम, माजी सरपंच भाऊ कदम, देवस्थानचे उपाध्यक्ष जयराम कदम तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी या सोहळ्यासाठी ह.भ.प. त्यागी महाराज यांना गोरखपूर येथे जाऊन निमंत्रण देण्याचा निर्णय घेतला.कलशारोहणासाठी पंचक्रोशीतील नाथपंथीय भाविक, ग्रामस्थ, तसेच नगर, राहुरी तालुक्यांतील प्रमुख गावांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास महाराष्ट्राचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे. गोरक्षनाथ मंदिराच्या या ऐतिहासिक क्षणासाठी सर्व तयारी सुरू असून, हा सोहळा धार्मिक उत्साह आणि एकात्मतेचा उत्सव ठरेल,अशी आशा व्यक्त होत आहे.

कृषी विद्यापीठांची निर्मिती शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीच : डॉ.इंद्रामणी मिश्रा

सरपडोह येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू यांचे प्रतिपादन



सोलापूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा घडविण्यासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली असून विद्यापीठातील संशोधन प्रत्यक्ष शेतात अंमलात आणल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रामणी मिश्रा यांनी केले.

सरपडोह (तालुका करमाळा) येथे कृषी संशोधन केंद्र बदनापूर, आत्मा करमाळा व जिद्द शेतकरी गटाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनामुळे फार्मर कप स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांनी तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला पाणी फाउंडेशनचे सीईओ सत्यजित भटकळ, कृषी अधिकारी डी. एल. मोहिते, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, तसेच कृषी संशोधन केंद्र बदनापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दीपक पाटील, डॉ. किरण जाधव, डॉ. ज्ञानदेव मुटकुळे, डॉ. विष्णू गित्ते आणि डॉ. प्रशांत सोनटक्के उपस्थित होते. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. नंदकुमार कुटे व डॉ. अनिल दुर्गुडे यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात शेतकरी गटांनी आपले अनुभव शेअर केले, तर फिसरे व सरपडोह येथील तुरीच्या प्लॉटची पाहणी करण्यात आली. पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन आशिष लाड यांनी केले. या कार्यक्रमाला तालुक्यातील ३५ शेतकरी गटांचे ४०० सदस्य उपस्थित होते. शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग व विज्ञानाधिष्ठित शेतीमुळे तालुक्याच्या कृषी क्षेत्राला नवा आयाम मिळत आहे.

इतर फळपिक शाळा सुरू होणार

फळ पिकांसाठी आवश्यक शिक्षण देण्यासाठी लवकरच इतर फळपिकांच्या शेती शाळा सुरू केल्या जातील, अशी माहिती पाणी फाउंडेशनचे सीईओ डॉ. सत्यजित भटकळ यांनी दिली.

एकत्रित तूर विक्रीचा उपक्रम

शेतकरी गटांनी एकत्रितपणे उत्तम दर्जाची तुर विक्रीसाठी प्रयत्न सुरू केले असून ही उत्पादने बाजारात चांगल्या दराने विक्रीसाठी पाठवली जातील, असे तालुका समन्वयक आशिष लाड यांनी सांगितले.

महापालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांचे होणार सर्वेक्षण



अहिल्यानगर । प्रतिनिधी

महापालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे महापालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येणार आहे. मार्च अखेरीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश मनपा प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले आहेत. दरम्यान, गेल्या २० वर्षात शहरात सर्वेक्षण झालेले नाही. महापालिका अधिनियमानुसार दर पाच वर्षांनी सर्वेक्षण होऊन पुनर्मल्यांकन करणे अपेक्षित आहे. आता हाती घेतलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणामुळे व पुनर्मूल्यांकनामुळे शहरातील सर्व मालमत्तांना कर आकारणी होईल. मार्च महिन्यानंतर नव्या मोजमापांच्या नोंदीनुसार कर आकारणी केली जाणार आहे. यातून महापालिकेचे उत्पन्न वाढेल, असा विश्वास प्रशासक डांगे यांनी व्यक्त केला.

प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी गुरुवारी (ता. १२) रोजी महापालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. महापालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करुन आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रीक सेवा संगणकीकरण करणे, विविध आज्ञावली विकसीत करुन इतर कामे करणे, यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महापालिका प्रशासनाकडून मे. सी. ई. इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांना कार्यारंभ देण्यात आला आहे. मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कार्पेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महापालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महापालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्रातील पहिल्या सेंद्रिय लेंडी पावडर युनिटला राहुरी कृषी विद्यापीठ सेंद्रिय विभाग प्रमुखाची भेट





मोहोळ । प्रतिनिधी

मोहोळ तालुक्यातील बिटले येथील ग्रामीण भागात पाच वर्षांपूर्वी उभारलेला सेंद्रिय लेंडी पावडर प्रकल्प हा महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव गृहउद्योग प्रकल्प ठरला आहे. शेतमजुराच्या मुलाने या प्रकल्पाची सुरूवात करून सेंद्रिय शेतीच्या चळवळीत अनोखा ठसा उमटवला आहे. कोणतीही जाहिरात न करता, दर्जेदार उत्पादने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविणाऱ्या या प्रकल्पाने पाचशेहून अधिक सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची साखळी निर्माण केली आहे.या प्रकल्पाला महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे सेंद्रिय विभाग प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे यांनी नुकतीच भेट दिली. प्रकल्पाच्या कार्यपद्धतीची सविस्तर पाहणी करत त्यांनी सेंद्रिय शेतीच्या विस्तारासाठी या प्रकल्पाने केलेल्या कामगिरीचे भरभरून कौतुक केले.

डॉ. सुर्वे यांनी घाटुळे नर्सरीतील रेसिड्यु फ्री पद्धतीने घेतलेल्या उत्पादनांचा आढावा घेतला. नर्सरीत वीएनआर पेरुच्या बागेतील आंतरपीक म्हणून ब्रोकोली, वांगी, झेंडू, ज्वारी, कलिंगड, खरबुज अशा सहा प्रकारच्या भाजीपाला पिकांची लागवड पाहिली. प्रगतशील शेतकरी सुनील घाटुळे यांनी अत्याधुनिक पद्धतीने घेतलेल्या विक्रमी उत्पादनांची माहिती डॉ. सुर्वे यांनी जाणून घेतली.घाटुळे नर्सरीचे संचालक सुनील घाटुळे यांनी डॉ. सुर्वे यांचा सत्कार केला. यानंतर बापूसाहेब घळके यांनी सेंद्रिय विभागाच्या संपूर्ण टीमचा सत्कार करून त्यांचे मार्गदर्शन लाभल्याबद्दल आभार व्यक्त केले. या वेळी सेंद्रिय विभागाचे डॉ. ताकटे, दिगंबर पाटील, आडसुरे, तसेच नर्सरीचे अनेक कर्मचारी व स्थानिक शेतकरी उपस्थित होते.घाटुळे नर्सरी व लेंडी पावडर युनिटचा प्रकल्प हा सेंद्रिय शेतीच्या चळवळीसाठी दीपस्तंभ ठरला आहे. भविष्यात या प्रकल्पाच्या यशस्वीतेचा आदर्श घेत महाराष्ट्रातील अन्य भागांतही सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन मिळेल, अशी आशा शेतकरी बांधवांकडून व्यक्त होत आहे.

राहुरी कृषी विद्यापीठाचा गौरव

डॉ. सुर्वे यांनी घाटुळे नर्सरीला राहुरी कृषी विद्यापीठाच्या आयडॉल म्हणून गौरव मिळणे ही बाब कौतुकास्पद असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांसाठी सर्वोत्तम दर्जेदार रोप व उत्पादने पुरवण्याच्या कार्याने नर्सरीने आदर्श घालून दिला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

सेंद्रिय खत निर्मितीचे महत्त्व

सेंद्रिय लेंडी पावडर युनिटचा अभ्यास करताना डॉ. सुर्वे यांनी खत निर्मितीची गुणवत्ता आणि शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्यांवर भर दिला. त्यांनी सांगितले की, घाटुळे नर्सरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जपलेले हित आणि गुणवत्तेचे भान अतिशय प्रेरणादायी आहे. अशा प्रकल्पांच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला गती मिळेल.

सेंद्रिय शेतीसाठी आदर्श प्रकल्प

डॉ. सुर्वे यांनी सांगितले, शेतकऱ्यांना दर्जेदार व रेसिड्यु फ्री उत्पादनासाठी मार्गदर्शन करणारा आणि दर्जेदार सेंद्रिय खतांचा पुरवठा करणारा हा प्रकल्प सेंद्रिय शेतीच्या विस्तारासाठी अत्यंत मोलाचा ठरत आहे. अशा प्रकल्पांमुळे सेंद्रिय शेतीला नवे परिमाण मिळत असून शाश्वत शेतीच्या दृष्टीने ही महत्वपूर्ण उभारणी आहे.

जेष्ठ संपादक पेन्शनसाठी सोलापुरात धरणे आंदोलन

माळशिरस । प्रतिनिधी

राज्यातील यादीबाह्य साप्ताहिक वृत्तपत्रांच्या जेष्ठ संपादकांना दरमहा वीस हजार रुपये पेन्शन देण्याच्या मागणीसाठी पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने रविवारी, १५ डिसेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन होणार आहे.राज्यातील साप्ताहिक वृत्तपत्र संपादकांनी आपले आयुष्य समाजाच्या न्याय व हक्कांसाठी समर्पित केले. अनेक संपादकांनी अन्यायग्रस्त, अत्याचारित आणि वंचित घटकांच्या आवाजाला न्याय मिळवून देण्यासाठी लेखणीच्या माध्यमातून प्रशासनासमोर आवाज उठवला. मात्र, यादीबाह्य साप्ताहिक वृत्तपत्रांना शासनाच्या जाहिराती मिळत नसल्याने हे संपादक आज वयोवृद्ध अवस्थेत आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत.

कोरोना महामारीच्या काळात देखील या संपादकांनी कुटुंबीयांच्या हिताला बाजूला ठेवत राष्ट्रीय कर्तव्य मानून शासनाच्या जनतेसाठी असलेल्या निर्णयांचे वार्तांकन केले. मात्र, आजारी



अवस्थेत औषधोपचारासाठी देखील त्यांच्याकडे आर्थिक साधने नाहीत.

पत्रकार सुरक्षा समितीने यादीबाह्य साप्ताहिक संपादकांना दरमहा २०,००० रुपये पेन्शन देण्याची मागणी करत सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांकडे २३ सप्टेंबर २०२४ रोजी निवेदन सादर केले होते. तसेच ११ ऑक्टोबर रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व २६ ऑक्टोबर रोजी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पत्रव्यवहार केला होता. मात्र, विधानसभा निवडणुकांमुळे व आदर्श आचारसंहितेमुळे हा मुद्दा प्रलंबित राहिला आहे.पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार यांनी सांगितले की, जेष्ठ संपादकांच्या हक्कांच्या या मागणीसाठी १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल. त्यांनी संपादक आणि पत्रकार बांधवांना या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारचे लक्ष वेधून जेष्ठ संपादकांना न्याय मिळवून देण्याचा समितीचा प्रयत्न आहे. पत्रकारिता क्षेत्रातील या अनुभवी आणि समर्पित व्यक्तींच्या योगदानाची दखल घेणे समाजाच्या आणि शासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

कष्टकरी शेतकऱ्याच्या मारकाची दुरावस्था

बदलापूर । प्रतिनिधी

भारत हा कृषिप्रधान देश असून भारत सरकारने शेतकऱ्यांसाठी विविध कर्ज योजना,कर्जमाफी,अवजारे खरेदीसाठी सबसिडी, असे अनेक उपक्रम राबून शेती विकसित करण्याचं प्रयत्न असतो व त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना शेतीकडे वळण्यासाठी त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी अनेक ठिकाणी कष्टकरी शेतकऱ्यांचे स्मारक शासनाकडून उभारले जात आहेत असच एक स्मारक बदलापूर मध्ये सुद्धा उभारण्यात आले आहे

बदलापूर मधील मांजर्ली परिसरातील 'आनंदी चांगो डायरे' चौकामध्ये कष्टकरी शेतकऱ्याचे स्मारक आहे व आता त्या स्मारकाची दुरवस्था झाल्याची दिसत आहे रहदारीच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या या स्मारकावरती मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले



आहे अनेक वर्षापासून या स्मारकाची डागडुजी झाली नसल्यामुळें स्मारकाचे कलर ही खराब झाले आहे या सर्व गोष्टींमुळे शेतकरी वर्ग नाराज असल्याचे दिसत आहे तसेच बदलापूर नगरपरिषदेचे सुद्धा या स्मारकाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे रेड लाईन,इमारत उभारणी, विकासाठी गेलेली जमीन, रस्ते,या अशा अनेक गोष्टींमुळे बदलापूरच्या शेतकऱ्यांकडे कमी प्रमाणात जमीन राहिली असून कष्टकऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नगरपरिषदेने या स्मारकाचे नूतनीकरण करून नेहमित देखभाल करावे या मागणीला जोर धरत आहे.

श्रीक्षेत्र दहेगाव येथे जनशांती धर्मसोहळा उत्साहात साजरा



वैजापूर । प्रतिनिधी

वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र दहेगाव येथे श्री संत जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित जनशांती धर्मसोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली, ज्याचे मानकरी श्री श्री १००८ स्वामी महामंडलेश्वर शांतिगिरी जी महाराज होते. या सोहळ्यात कृषीभूषण आप्पासाहेब पाटील, डॉ. दिनेश गावपरदेशी, तसेच पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.धर्मसोहळ्याच्या निमित्ताने स्वामी महामंडलेश्वर शांतिगिरी जी महाराज यांनी उपस्थित भाविकांना प्रवचनाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. त्यांच्या अमृतवाणीतून भक्तांनी अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ घेतला.धर्मसोहळ्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला, ज्यामध्ये पंचक्रोशीतील भक्तांनी एकत्र येऊन सामाजिक सलोखा आणि आपुलकीचा अनुभव घेतला.जनशांती धर्मसोहळा हा दहेगाव परिसरातील महत्त्वाचा धार्मिक उत्सव ठरतो. यावर्षीच्या कार्यक्रमानेही भाविकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळवत एकता आणि श्रद्धेचा सुंदर संगम साधला.

ज्योतिबा मंदिर बांधकामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले

उदगीर । प्रतिनिधी

उदगीर तालुक्यातील करडखेल येथे ज्योतिबा मंदिर बांधकामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वसंत पाटील यांच्या हस्ते हा धार्मिक सोहळा पार पडला.माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी आपल्या कार्यकाळात धुळोबा मंदिराच्या सभागृहासाठी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्याच सभागृहाच्या बांधकामासाठी भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला सरपंच बाळासाहेब मुळे, उपसरपंच गिरीश राघू, पोलीस पाटील एकनाथ कसबे, व्हाईस चेअरमन मनोहर



हत्ते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग कसबे, सेवानिवृत्त शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबनराव नरवटे यांच्यासह अनेक मान्यवर व गावकरी उपस्थित होते.धार्मिक कार्यक्रमाला गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. ज्योतिबा मंदिराच्या उभारणीसाठी गावकऱ्यांनी एकत्र येत आपल्या सहभागाची भावना व्यक्त केली.हा सोहळा करडखेलच्या धार्मिक व सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला आहे.

गिरगाव येथील गिता अशोक बोरकर यांची सरपंच सेवा महासंघाच्या चंद्रपूर जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

तळोधी (बा) । प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील गिरगाव येथील सरपंच आणि तालुका महिला महामंत्री श्रीमती गिता अशोक बोरकर यांना सरपंच सेवा महासंघाच्या चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती देण्यात आली आहे.सरपंच महासंघाचे राज्याध्यक्ष पुरूषोत्तम घोगरे यांच्या हस्ते अंजनगाव सुर्जि, जिल्हा अमरावती येथे गिता अशोक बोरकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

या कार्यक्रमात सरपंच सेवा महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष हेमंत लांजेवार, राज्य कोषाध्यक्ष सदाशिव डुगे, तसेच गिरगाव



येथील सामाजिक कार्यकर्ते तानाजी थेरकर आणि निर्मल आंबडाहारे उपस्थित होते.या नियुक्तीमुळे गिता अशोक बोरकर यांचा सामाजिक कार्यात आणखी मोठा ठसा उरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत काटाळवेढा ता.पारनेर जि.अहमदनगर या जाहीर निविदा नोटीसी व्दारे कळविण्यात येते कि,मौजे काटाळवेढा ग्रामपंचायत अंर्तगत खालील प्रमाणे कामे करण्यासाठी व -१ निविदा मा.कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील नोदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत .तरी निविदा नोदणीकृत ठेकेदारांनी ग्रामपंचायत काटाळवेढा कार्यालयात दिनांक १३ /०७/ २०२४ दिनांक: १९/०७/२०२४ अखेर कार्यलयीन वेळेत सायंकाळी ६ :१५ वाजेपर्यत सादर करावीत.

अ.न.	कामाचे नाव	योजना व सन	निवडा रक्कम	बयाना रक्कम	निविदा फॉर्म फी	ठेकेदाराची वर्गवारी
१)	मौजे काटाळवेढा येथील संत रोहिदास नगर वस्ती येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे	अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे सन २०२३-२०२४	४१९१८९/-	---	५९०	सु.वे.अ

नियम व अटी

१)दिनांक १९ /०७/२०२४ रोजी नंतरची निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाही.

२)अनु क्र १ ची निविदा जिल्हा परिषदेकडे नोदनीकृत ठेकेदार यांनी दाखल कराव्यात.

३) सदर कामाचे सर्व शासकीय कपाती शासनाच्या आदेशानुसार जि एस टी चा विचार करून निविदा दाखळ कराव्यात

४)सदर कामे अंदाजपत्रकानुसार म. उप अभियंता पंचायत समिती पारनेर यांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे करण्यात यावीत

५) कामाचे देयक मोजमाप नोदणी पुस्तकाप्रमाणे व उपलब्ध निधी नुसार देण्यात येतील. वरील निविदा ग्रामपंचायत काटाळवेढा येथे दिनांक २० / १२ /२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील निविदा धारकाने स्वत: उपस्थित राहावे त्या नंतर तक्रार चालणार नाही. ७) निविदा मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ८) वर नमूद कोष्टकात दर्शविले प्रमाणे निविदा फॉर्म व इसारा रक्कम भरणा करावी लागेल .९)अंदाज पत्रक निविदा नोटीसी मधील अति व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.१०) कोरी निविदा ग्रामपंचायत कार्यालय काटाळवेढा येथे उपलब्ध होतील ११) जि.प.प्रमाणपत्रावरती सवलत असल्यास बयाना रक्कम भरणे सवलत राहील.

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत काटाळवेढा
ता.पारनेर जि.अहमदनगर

सरपंच
ग्रामपंचायत काटाळवेढा
ता.पारनेर जि.अहमदनगर

टेमुर्डा येथील दारू दुकानाला परवानगी देऊ नका अन्यथा आंदोलन करू

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची जिल्हाधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांच्याकडे मागणी

चंद्रपूर । प्रतिनिधी

वरोरा तालुक्यातील ग्रामपंचायत टेमुर्डा परिसरात बेकायदेशीरपणे सुरेश टिकाराम अहिरकर रा. नांदगाव ता. मुल यांचे देशी दारूचे तथा इतर वाईन शॉपी चे दुकान कुख्यात दारू तस्कर अंजु अन्ना यांच्या माध्यमातून स्थानंतरण केल्या जात असल्याने या परिसरातील गरीब तरुण युवकांना नशेच्या आहारी जाण्याची भीती असल्यामुळे सामाजिक आरोग्य यामुळे धोक्यात आल्याने टेमुर्डा येथे देशी दारू दुकानाचे स्थानंतरण करू नये अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनसे स्टाईल आंदोलन करेल असा इशारा मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे व टेमुर्डा परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. यावेळी असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वरोरा तालुक्याच्या खांबाडा येथील कुख्यात दारू तस्कर अंजु अन्ना यांच्यावर दारूबंदी दरम्यान व त्या अगोदर दारू तस्करीचे अनेक गुन्हे विविध पोलीस स्टेशनं मध्ये दाखल असतांना त्यांना खांबाडा येथे आकाश नामक बिअर बार ची राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माध्यमातून बेकायदेशीर मंजुरी देण्यात आली होती, त्या खांबाडा येथील बिअर बार मधून दारूबंदी असलेल्या हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यात विदेशी दारूचा पुरवठा अंजु अन्ना यांचे लोकं करतात त्यामुळे या परिसरात बिअर बार सोबतच देशी दारूचे दुकान टेमुर्डा येथे सुरु करण्यासाठी त्यांनी सुरेश टिकाराम अहिरकर रा. नांदगाव ता. मुल यांचे देशी दारूचे दुकान स्थानंतरण करण्यासाठी टेमुर्डा ग्रामपंचायत ला अर्ज दिला होता, त्या अर्जाच्या अनुषंगाने महिलांची ग्रामसभा दिनांक १८/०७/२०२४ रोजी ग्राम पंचायत टेमुर्डा येथील सभागृहात आयोजित केली होती सदर महिला सभेच्या अध्यक्ष म्हणून सुचिता प्रवीण ठाकरे सरपंच ग्रामपंचायत टेमुर्डा यांची उपस्थिती होती. सदर सभेला उपस्थित महिलांनी देशी दारू सुरु करण्याचे बाजूने १०२ मते तर सुरु न करण्याचे बाजूने १२१ महिलांचे मतदान झाले, यावरून टेमुर्डा ग्रामपंचायत परिसरात देशी दारूचे दुकान सुरु करण्यासाठी महिला सभेतून विरोध करण्यात आला होता आणि देशी दारू सुरु कारण्याबाबत महिलांच्या महत्वपूर्ण सभेतून इथे देशी दारू दुकान सुरु करण्यात येऊ नये असे स्पष्ट संकेत आहे, मात्र तरीही या परिसरात देशी दारूचे दुकान सुरु करण्याच्या हालचाली अंजु अन्ना यांच्या माध्यमातून सुरु असून त्यासाठी त्यांनी टेमुर्डा येथे जागा घेऊन बांधकाम सुरु केले आहे, टेमुर्डा गाव ही जवळपास ३० ते ३५ गावाची बाजारापेठ असून या ठिकाणी जर देशी दारूचे दुकानाला मंजुरी मिळाली तर कायदा सुव्यवस्था धोक्यात येऊ शकतो आणि कुख्यात दारू तस्कर अंजु अन्ना यांची या देशी दारू दुकानाच्या माध्यमातून हिंगणघाट समुद्रपूर या दारूबंदी तालुक्यात दारूचा पुरवठा होऊ शकतो सोबतच टेमुर्डा खांबाडा या परिसरातील गावागावात देशी दारू पुरवठा होऊन विद्यार्थी तरुण युवक यांना दारूचे वेसण लागू शकते आणि त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडू शकते, अगोदरचं राज्य उत्पादन शुल्क विभागाने चुकीच्या पद्धतीने अनेक ठिकाणी बेकायदेशीर दारूचे दुकान बिअर बार मंजूर करून मोठा भ्रष्टाचार केला असल्याची उदाहरणे समोर असतांना आता टेमुर्डा येथे देशी दारू दुकानाला मंजुरी देणे म्हणजे इथेही राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कुख्यात दारू तस्कर अंजु अन्ना यांच्याकडून लाखों रुपये घेतले असल्याची स्थिती दिसत आहे, त्यामुळे या गंभीर प्रकरणी चौकशी करून देशी दारू दुकानाचे स्थानंतरण होऊ देऊ नये अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आपल्या प्रशासनाविरोधात मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे यांनी जिल्हाधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिलेल्या निवेदनातून दिला आहे, यावेळी मनसे वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष महेश वासलवार, जनहीत कक्ष विभाग जिल्हाध्यक्ष सुनील गुढे, रमेश काळबांधे, मोहित हिवरकर, किशोर धोटे, धनराजव बाटबरवे, महाराष्ट्र सैनिक व असंख्य नागरिक उपस्थित होते

श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमार्फत होणार मोफत उपचार

शिर्डी । प्रतिनिधी

काल गुरुवार दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतुन उपचाराची सुरुवात करणेत आली. सदर कार्यक्रमाचा शुभारंभ श्री साईबाबा संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या हस्ते रुग्णांची नोंदणी करुन करण्यात आला. श्री साईनाथ रुग्णालयात सर्व उपचार मोफत होतात. त्याच धर्तीवर शासनाने सुरु केलेल्या महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातुन पात्र रुग्णांवर मोफत उपचार दिले जाणार आहे.



श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे सदरील योजना सन -२०१३ पासुन सुरु करणेत आलेली आहे या योजनेच्या मार्फत हृदयाच्या, मेंदुच्या तसेच इतर विविध आजाराचे उपचार मोफत केले जातात. श्री साईबाबा हॉस्पिटल हे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या अमंलबजावणीच्या बाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर असुन श्री साईनाथ रुग्णालय सुद्धा त्याच धर्तीवर राज्यात योजनेच्या बाबतीत अग्रगण्य बनवावे असे आवाहन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रसंगी केले. यावेळी प्र.वैद्यकीय संचालक डॉ.प्रितम वडगावे, प्र.वैद्यकीय अधिक्षक डॉ.मैथिली पितांबरे, जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे, प्र.अधिसेविका नजमा सय्यद ई. डी. पी. मॅनेजर अनिल शिंदे, साईप्रसाद जोरी यांचेसह आरोग्य मित्र तसेच रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचारी उपस्थीत होते.

मुख्यमंत्री माझी सुंदर शाळामध्ये तालुकास्तरावर बाळगव्हाण शाळा प्रथम

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा क्र. २ मध्ये तालुकास्तरावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाडगव्हाण शाळेने प्रथम क्रमांकाचे बक्षिस पटकावले. द्वितीय क्रमांक ढोरजळगावशे तर तृतीय क्रमांक तळणी शाळेने पटकावला.प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या शाळांना शासनातर्फे प्रत्येकी अनुक्रमे तीन लाख, दोन लाख व एक लाखांचा पुरस्कार मिळणार आहे.मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत १५० गुणांचे परीक्षण करण्यात आले. त्यात अध्ययन निष्पत्तीनुसार विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, आनंददायी शिक्षण, शिक्षकांनी केलेली शैक्षणिक साहित्य निर्मिती, परसबाग निर्मिती, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कंपोस्ट खत निर्मिती यासह विविध बाबींचे केंद्र व तालुकास्तरावर परीक्षण करण्यात आले. बोधेगाव बीटातील बाडगव्हाण ही तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविलेली शाळा द्विशिक्षकी ३५ विद्यार्थ्यांची प्राथमिक शाळा असून त्या



शाळेत मुख्याध्यापक राजू साळवे व कृतीशील शिक्षक अमोल कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविले.त्यामुळे तालुक्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान बाडगव्हाण शाळेने पटकावला. तसेच वरूर बुद्रुक, ढोरजळगावशे व तळणी शाळेतही विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पायाभूत सुविधांसह शैक्षणिक प्रगतीचे उपक्रम राबविण्यात आल्याने या शाळांनी यश मिळविले. या यशाबद्दल गटविकास अधिकारी अजितकुमार बांगर, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शैलजा राऊळ, बोधेगाव व भातकुडगाव बीटचे कृतीशील शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.शंकर गाडेकर, बोधेगाव व बालमटाकळीचे केंद्रप्रमुख काळू भांगरे, घोटणच्या केंद्रप्रमुख मीरा केदार, भातकुडगावचे केंद्रप्रमुख सुभाष नन्नवरे आदींनी यशस्वी शाळांचे व शिक्षकांचे कौतुक करीत अभिनंदन केले आहे.वरुर बुद्रुक शाळेने चढविला कळसतालुक्यातील वरूर बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेने जिल्हास्तरावर दुसरा क्रमांक पटकावून या पारितोषिक मालिकेत कळस चढविला आहे

बिट स्तरीय शालेय स्पर्धेत बाळेवाडी शाळेचे घवघवीत यश



सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील बाळेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी बिट स्तरीय शालेय स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. या स्पर्धा बाळेवाडी शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये लहान गटातील मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात वरकट आणि बाळेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये थरारक सामना झाला, ज्यात बाळेवाडी शाळेने विजयी झंकार दिला.

शाळेच्या मुख्याध्यापक जयंत देशमुख, क्रीडाशिक्षक अभिजित गायकवाड, रेश्मा कोरबू, पुष्पां नगरे, काझी आणि इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल शाळेच्या व्यवस्थापन समितीने व बाळेवाडी गावातील ग्रामस्थांनी खेळाडूंना आणि त्यांच्या मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना विशेष अभिनंदन केले

बेरोजगारीचा बळी;शेगाव बु. येथील युवकाची आत्महत्या

वरोरा । प्रतिनिधी

शेगाव बु. येथील बेरोजगार युवक आकाश गुलाब कथवटे (वय २८) याने आज सकाळी अंदाजे ९ ते १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊनआत्महत्या केली. आकाश बेरोजगार होता आणि वडिलांच्या पाणटपरीच्या व्यवसायात हातभार लावत असे. मात्र, घरची शेती नसल्याने आणि पाणटपरीच्या उत्पन्नावर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह करणं अवघड झालं होतं. शिक्षण असूनही नोकरी मिळत नसल्यामुळे आणि वय वाढत असल्याने तो मानसिक तणावात होता. या सर्व समस्यांनीग्रस्त आकाशने जीवनयात्रा संपवणे अधिक सोयीचे वाटलेअसावे.



बेरोजगारीमुळे आणखी एका युवकाचा बळी गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सरकारने आता तरी रोजगारनिर्मितीबाबत ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जनतेतून होत आहे. या घटनेचा पुढील तपास शेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार योगेंदसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

दिव्यांग व सामान्य बाल कला महोत्सवाचे उद्घाटन आज

चंद्रपूर । प्रतिनिधी

देववाणी दिव्यांग बहुउद्देशीय संस्था चंद्रपूरतर्फे आयोजित दिव्यांग व सामान्य बाल कला महोत्सवाचा उद्घाटन सोहळा आज, १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता प्रियदर्शिनी नाट्यगृह, चंद्रपूर येथे होणार आहे. या महोत्सवाचा महाअंतिम सोहळाही उद्घाटनानंतर पार पडणार आहे.

चंद्रपूर विधानसभेचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते महाअंतिम सोहळ्याचे उद्घाटन होणार आहे. सोहळ्यास परीक्षक म्हणून चोखेश्वर नाकाडे, मोहित पुराणकर आणि राहूल चौधरी यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत गायन, वादन, नृत्य, आणि फॅशन शो अंतर्गत ऑडिशन राऊंडमधून निवड झालेल्या स्पर्धकांची रंगतदार अंतिम फेरी होणार आहे.



दिव्यांग व सामान्य बाल कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा मेघना शिंगरू, स्मिता रेभणकर, शालिनी ठाकरे, सुशील सहारे, अमोल कडूकर, अश्विनी तोमर आणि निखिल आसवानी यांनी केले आहे.

भद्रावती येथे विवेकानंद संगीत कला अकादमीचे उद्घाटन संपन्न

भद्रावती । प्रतिनिधी

आजच्या काळात जर संगीत नसते तर मनुष्याच्या जीवनातील मनोरंजनाचा अविभाज्य भाग गेला असता. आनंदप्राप्तीसाठी, मनःशांतीसाठी संगीताचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. जर संगीत नसते तर आपण स्वरांची सुमधुरता कधीच अनुभवू शकलो नसतो. संगीतामुळे माणसाची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती विकसित होते.हे लक्षात घेऊन विवेकानंद संगीत कला अकादमी सुरू करण्यात आली.असे विचार विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान यांनी व्यक्त केले. ते स्थानिक विवेकानंद महाविद्यालय परिसरात सुरू करण्यात आलेल्या विवेकानंद संगीत कला अकादमीचे उद्घाटन करताना अध्यक्षस्थानावरून बोलत होते.यावेळी मंचावर डॉ यशवंत घुमे, जेष्ठ नागरिक गुलाब झुंगरे, उध्दव आसुटकर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री स्वान म्हणाले



की, संगीत अकादमीतून दर्जेदार कलावंत तयार होण्यासाठी संस्थेकडून जी मदत लागेल ती केली जाईल. विद्यार्थ्यांनी प्रचंड परीश्रम घेऊन उत्कृष्ट कलावंत व्हावे व शहराच्या नावलौकिकात भर टाकावी असे विचार मांडले.यावेळी उपस्थित शिक्षणार्थी विद्यार्थी कलावंतांनी भावगीते, भजन, अभंग, सिनेगीत गाऊन उपस्थितांची वाहवा मिळवली. या अकादमीत झी टिव्हीवरील अनेक मालिकांमध्ये संगीतकार म्हणून काम पाहणारे अमीत लभाने यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमीत लभाने, संचालन व आभारप्रदर्शन प्रा. श्रीकांत दाते यांनी केले. यावेळी झनकजी चौधरी, पुंडलिक ढोके,वामन वाढई, वेदांत कुलते,राखी खारटकर,लक्ष्मी बावणे,अक्षय रॉय, प्रा.धनंजय बेलगांवकर, प्रा.सुभाष खोके, प्रा.राजू बैरम , लक्ष्मी बावणे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे जयंती नेवाशात विविध उपक्रमाने साजरी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर: अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधत भानसहिवरे येथील संत गाडगे बाबा आश्रम शाळेतील विध्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळांचे वाटप करण्यात आले. भानसहिवरे येथील गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या पुढाकारातून हा विधायक उपक्रम करण्यात आला.नेवाशाचे नायब तहसीलदार किशोर सानप यावेळी अध्यक्षस्थानी होते.

प्रारंभी पोपट शेकडे राजेंद्र कीर्तने यांनी उपस्थितांचे स्वागत केले.नायब तहसीलदार सानप, सुनील लंघे भाजपा युवा मोर्चाचे प्रताप चिंधे, वडूले सरपंच दिनकर गर्जे, अनिल गर्जे,राजेंद्र कीर्तने,बाबासाहेब गोल्हार, डॉ निर्मला सांगळे आदींच्या हस्ते स्व गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नायब तहसीलदार सानप, लंघे, गर्जे, विष्णू सांगळे महाराज यांनी स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याची माहिती भाषणातून सांगितली.लोकनेते



मुंडे व आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यातील गुरु शिष्याच्या प्रेमातून आमदार लंघे यांनी स्व मुंडे यांचा हात धरून संघर्ष करत तत्कालीन राजकीय प्रवासाला सुरुवात केली होती याची आठवण होते यावेळी प्रताप चिंधे व दिनकर गर्जे यांनी भाषणातूनसांगत स्व मुंडे व आमदार लंघे यांच्यातील निकटच्या संबंधाची माहिती सांगितली.पोपट शेकडे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.भानसहिवरे सरपंच किशोर जोजार,मंडळाधिकारी सरिता मुंडे, लक्षण मोहिटे, शेतकरी संघटनेचे नाबदे,मानव साळवे, आकाश सानप, विशाल नजन,संत गाडगे बाबा आश्रम शाळेचे मुख्याध्यापक नितीन कांबळे, सहशिक्षक रमेश डोळे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरावर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचा हस्ते ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन शुभारंभ

सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्या–जिल्हाधिकारी

अकोले । प्रतिनिधी



जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. देशासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने ध्वजदिन निधीसाठी मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी श्री.सालीमठ यांनी केले.

कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उप विभागीय पोलीस अधिकारी संपतराव भोसले , श्री साईबाबा संस्थानचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप भोसले, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लिडर वि.ल. कोरडे (निवृत्त) आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, जिल्ह्यात सैनिक आणि माजी सैनिकांची साधारण १४ हजार कुटुंबे आहेत. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ध्वजदिन निधी संकलन महत्वाचे आहे. यावर्षी २ कोटी ८० लाखाचे उद्दिष्ट असले तरी ६ कोटीचा निधी संकलित करण्याचे उद्दीष्ट ठेवून प्रत्येकाने यात भरीव योगदान द्यावे. प्रत्येक अधिकारी – कर्मचाऱ्याने एक दिवसाचा पगार ध्वजदिन निधीसाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याने गेल्यावर्षी विक्रमी संकलन केल्याबद्दल जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी,कर्मचारी आणि नागरिकांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केले आहे. सैनिकप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

पद्मश्री पवार म्हणाले, वीर जवान सीमेवर आणि किसान गावातील शेतात देशासाठी कार्य करतो. या दोघांवर देशाची जबाबदारी आहे. देशासाठी सीमेवर लढताना अनेक बांधवांना वीर मरण येते, तर काहींना कायमचे अपंगत्व येते. अशा सैनिकांच्या कुटुंबियांना मदत करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातून अधिकाधिक निधी संकलित व्हावा यासाठी नागरिकांनी योगदान द्यावे आणि माजी सैनिकांना शक्य असेल तिथे सहकार्य करावे. पुढील वर्षी जिल्ह्यातील सरपंचांचे ध्वजदिन निधीला भरीव योगदान राहावे यासाठी आपण पुढाकार घेऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रास्ताविकात श्री. कोरडे म्हणाले, भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुर्नवसनाकरिता सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन करण्यात येते. यात लोकसहभागाला महत्व आहे. सैनिकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नव्या पिढीत राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो. यावर्षी ५ कोटी ८ लाख रुपये अर्थात उद्दिष्टाच्या २७५ टक्के निधी संकलन करण्यात आले आणि २ कोटी १८ लाख रुपयांचा निधी माजी सैनिकांच्या कल्याणासाठी वापरण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शहीद जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मनोहर नरहरी नातू यांच्यावतीने वीर पत्नी कौसल्या एकनाथ कर्डिले यांना एक लाख रुपयाचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. श्री.नातू यांनी सलग दहाव्या वर्षी असा निधी दिला आहे. यावेळी माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक कामगिरीबद्दल विशेष गौरव पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले.

माजी सैनिक भाऊसाहेब रावजी पवार यांच्यातर्फे देण्यात येणारा १० हजाराचा निधी वीरपत्नी मिनाबाई भानुदास गायकवाड यांना धनादेशाद्वारे देण्यात आला. ध्वजदिन निधीसाठी १० हजार रुपये योगदान देणाऱ्या श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराज आराधना भक्त मंडळ आणि २ लाख रुपये योगदान देणाऱ्या सन फार्मा प्रा.लि. चा यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार करण्यात आला. सीजी पॉवर संस्थेतर्फे सामाजिक दायित्व निधीतून सैनिकी मुलींच्या वसतिगृहासाठी २५ लाख रुपयाचे काम केल्याबद्दल संस्थेच्या प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी सैनिकांसाठी कार्य करणाऱ्या अक्षय टेमकर आणि ज्ञानदेव शेळके यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, माजी सैनिक, माजी सैनिकांचे कुटुंबीय, वीर पत्नी, वीर माता, वीर पिता आदी उपस्थित होते.

चंद्रभागा शिंदे यांना मेंदूवरील उपचारासाठी एक लाख रुपयांची मदत

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या प्रयत्नाला यश

सोलापूर । प्रतिनिधी



शाहूनगर येथील चंद्रभागा मगन शिंदे यांच्यावर मेंदूवरील शस्त्रक्रिये साठी अहमदनगरच्या पॅसिफिक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. या उपचारांसाठी लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित होता.

चंद्रभागा शिंदे यांनी करमाळा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाशी संपर्क साधत मदतीची विनंती केली. या विनंतीनुसार, वैद्यकीय कक्ष समन्वयक नागेश शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाकडे अर्ज सादर करण्यात आला.

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे शिंदे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय मदत निधीतून एक लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली. ही रक्कम थेट पॅसिफिक हॉस्पिटलच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. करमाळा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक गरजू रुग्णांना मदत करण्यात आली आहे. या यशस्वी प्रयत्नांत माजी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचेही महत्त्वाचे योगदान आहे.

चंद्रभागा शिंदे यांच्या नातेवाईकांनी सांगितले की, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या मदतीमुळे आम्हाला मोठा आधार मिळाला. एकनाथ शिंदे हे खऱ्या अर्थाने गोरगरीब रुग्णांचे आधार आहेत.३

राजे रावरंभा शेतकरी प्रोड्यूसर कंपनीकडून ठिबक खरेदीसाठी ५ हजार रुपयांचे अनुदान

योजनेचा लाभ घेण्याचे अध्यक्ष डॉ.विकास वीर यांचे आवाहन

सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील राजे रावरंभा शेतकरी प्रोड्यूसर कंपनीने ठिबक सिंचन किंवा स्प्रिंकलर खरेदी करणाऱ्या सभासदांसाठी शासकीय अनुदानाव्यतिरिक्त ५ हजार रुपयांचे थेट अनुदान जाहीर केले आहे.

कंपनीच्या अध्यक्ष डॉ. विकास वीर यांनी योजनेची माहिती देताना सांगितले की, एका सभासदाला १ एकर क्षेत्रासाठी हे अनुदान मिळणार आहे. जास्त क्षेत्रासाठी ठिबक खरेदी केल्यास अनुदान मात्र १ एकरच देण्यात येईल. ठिबक खरेदीसाठी जैन कंपनीचे आयएसआय मानांकित साहित्य घेणे आवश्यक आहे.

कंपनीने विषमुक्त शेतीसाठी 'प्रो राईस' प्रकल्प राबवला असून, शेतकऱ्यांना पाणी बचतीचे तंत्र आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. दुसऱ्या टप्प्यातील शेअर्स विक्री सुरू झाली असून, महिला सभासदांसाठी केवळ २१०० रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. कंपनीने अल्पावधीतच दोन कोटींहून अधिक उलाढाल केली आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पाणी बचतीचे तंत्रज्ञान आणि विषमुक्त शेतीसाठी प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या इसमा वरती देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा–राजाभाऊ कदम

सोलापूर । प्रतिनिधी



परभणी येथे दिनांक १० डिसेंबर रोजी संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या इस्मा वरती व त्याच्या पाठीशी असणाऱ्या गुप्त शक्तीचा शोध घेऊन देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन बहुजन संघर्षनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले सदर निवेदनामध्ये बहुजन संघर्षणेने मागणी केली आहे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या इसमा वरती व त्याच्या पाठीशी असणाऱ्या शक्तीचा शोध घेऊन त्यांच्यावरती देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यामुळे संविधानावरती व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवरती प्रेम करणाऱ्या आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या पर्यायाने आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली आंदोलने केली मात्र पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करून दलित समाजातील तरुण कार्यकर्त्यांवरती लाठीचार्ज करून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे असे गुन्हे दाखल झाल्यामुळे दलित समाजातील तरुणांची पिढी बरबाद होईल तरुणांवरती गुन्हे दाखल करू नयेत दाखल केलेले गुन्हे माघारी घ्यावेत कारण संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली नसती तर आंबेडकरी जनता रस्त्यावरती उतरली नसती मग संविधानाची विटंबना झालीच नाही पाहिजे म्हणून शासनाने पूर्ण खबरदारी घेतली असती तर आंबेडकरी जनतेने रस्त्यावर उतरून आंदोलन केले नसते आणि भविष्यात सुद्धा विटंबना होऊ नये म्हणून कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी महाराष्ट्राच्या गृह खात्याची आहे कायदा सुव्यवस्था आभादीत राखण्यामध्ये गृहखात कमी पडत असेल तर समाजामधून उद्रेक असा उपळतच राहील ही सर्व जबाबदारी शासनाची आहे त्यामुळे आम्ही मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन विटंबणे सारखे प्रकार घडणार नाहीत याची उपाययोजना करण्याची मागणी केली आहे घडलेल्या प्रकाराचा जाहीर निषेध करून दलित समाजाच्या तरुण पिढीवरती गुन्हे दाखल करून तरुण पिढीचे करियर बरबाद होणार नाही याची सुद्धा शासनाने दखल घेतली पाहिजे अशी मागणी बहुजन संघर्ष सेनेने मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे सदर मागणीचे निवेदन नायब तहसीलदार लोकरे साहेब यांनी स्वीकारले असून वरिष्ठांना कळवतो असे सांगितले यावेळी उपस्थित करमाळा शहराध्यक्ष अजिनाथ कांबळे, करमाळा शहर सचिव कालिदास कांबळे, जिल्हा सचिव आप्पा भोसले, तालुका सचिव रमेश भोसले, संघटक राहुल कांबळे, संघटक अतुल चव्हाण, बापूसाहेब कांबळे, समशेर सय्यद, केकान सर आधी जण उपस्थित होते.

भाजपाचे १२ जानेवारीला शिर्डीत प्रदेश अधिवेशन अमित शाह,नड्डा यांची उपस्थिती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार

अहिल्यानगर । प्रतिनिधी



अहिल्यानगर : भारतीय जनता पार्टीचे शिर्डी जि. अहिल्यानगर येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी, १२ जानेवारी २०२५ रोजी प्रदेश अधिवेशन होणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

या वेळी केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित राहणार आहेत.

१२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांची जयंती आहे. याचे औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश भाजपाने एक मोठा उपक्रम हाती घेतला आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित हे अधिवेशन असेल. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनुसार युवकांना प्रेरित करून भाजपाकडे आकर्षित करण्यासाठी या वेळी नवीन अभियानाची सुरुवात होणार आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा या अधिवेशनात भव्य सत्कार केला जाणार आहे.

शिर्डी येथील अधिवेशनासाठी राज्यभरातून सुमारे १० हजार भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले आहे. तरुणाईशी संपर्क वाढविण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याने हे अधिवेशन भाजपाच्या आगामी काळातील योजनांसाठी महत्त्वाचे असेल, असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

देशाच्या संरक्षणात सैनिकांचे योगदान महत्वपुर्ण–जिल्हाधिकारी विनय गौडा

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

चंद्रपूर । प्रतिनिधी



मेवरील सैनिक हे स्वत:च्या कुटूंबापासून दूर राहून प्रतिकुल परिस्थितीत देशाची सुरक्षा करण्याची महत्वाची जबाबदारी पार पाडीत असतात. सीमेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांमुळेच आपण सुरक्षित असून देशाच्या संरक्षणात सैनिकांचे योगदान महत्वपुर्ण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले. नियोजन भवन सभागृह येथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शुभम दांडेकर, माजी सैनिक बहूउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष हरीष गाडे, देवानंद काळबांडे, जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी तसेच विविध कार्यालय प्रमुखांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, तिन्ही सशस्त्र दलाचे बलिदान व योगदान देशासाठी अमुल्य आहे. माजी सैनिक मेळाव्याच्या माध्यमातून शहिद सैनिकांचे स्मरण तसेच माजी सैनिकांच्या कुटुंबांच्या कल्याणासाठी दरवर्षी ध्वजदिन निधी संकलीत केला जातो. यातून त्यांच्या कुटूंबियांच्या कल्याणासाठी मदत होणार आहे. जिल्ह्याने मागील वर्षी निधी संकलनात ९८.९६ टक्के उद्दीष्ट पुर्ण केले आहे. सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधी संकलनात सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन देवून योगदान द्यावे. जेणेकरुन, १०० टक्के उद्दिष्ट साध्य करता येईल. निधी संकलनात सर्वांनी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन देखील जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

प्रास्ताविकेत बोलतांना जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शुभम दांडेकर म्हणाले, पूरपरिस्थिती, दुष्काळ, भुकंप यासारख्या नैसर्गिक परिस्थितीत देखील सैनिकांची मदत घेतली जाते. या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. ध्वजनिधीतून सैनिकांच्या वारसांना आर्थिक मदत करणे, शहीद व सेवारत सैनिकांच्या परिवारांना मदत करणे, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे या निधीतून करण्यात येते. गत वर्षी ३९ लक्ष ८४ हजाराचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ३९ लक्ष ४२ हजार ६०७ निधीचे संकलन झाले असून ९८.९६ टक्के उद्दिष्ट साध्य केले असल्याची माहिती शुभम दांडेकर यांनी दिली.

वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी तसेच शौर्यपदक धारकांचा सत्कार : वीरपत्नी वेंकम्मा गोपाल भिमनपल्लीवार, अरुणा सुनिल रामटेके, वीरमाता शिला सुदाम कोरे, पार्वती डाहुले, छाया बालकृष्ण नवले, वीरपिता वसंतरावजी डाहुले, बालकृष्ण नवले तसेच माजी सुबेदार (शौर्यचक्र) शंकर मेंगरे यांना शॉल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

ध्वजदिन निधी संकलनात सहभाग घेणाऱ्यांचा सत्कार : मागील वर्षी ध्वजदिन निधी संकलन कार्यात विविध कार्यालयांनी मोलाची कामगिरी केली आहे. सदर कार्यालय प्रमुखांना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

विशेष गौरव पुरस्कार धनादेशाचे वितरण : माजी सैनिक वसंत खामनकर यांचे पाल्य कुमार अभिनंदन यास क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल २५ हजारांचा धनादेश देवून गौरविण्यात आले.

सैनिक कल्याण विभागातर्फे शिष्यवृत्ती धनादेशाचे वाटप : सैनिक कल्याण विभागातर्फे माध्यमिक, उच्च माध्यमिक अभ्यासक्रमात उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झालेल्या शुभम बुरांडे, सुहानी पिसे, प्रथमेश तेलरांधे, अजहर शकील या पाल्यांना (१०वी करीता) रु. २ हजार ५०० तर आयुष फुले यास (१२ वी करीता) रु. ५ हजार शिष्यवृत्ती धनादेशाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन हेमंत शेंडे यांनी केले तर आभार देवानंद काळबांडे यांनी मानले.

महाराष्ट्रात सोलापूर पोलीस 'डायल ११२' प्रथम क्रमांकावर

माळशिरस । प्रतिनिधी

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या डायल ११२ आपत्कालीन प्रतिसाद पथकाने नोव्हेंबर २०२४ महिन्यात उत्कृष्ट कामगिरी करून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहिता, राजकीय सभा, कायदा व सुव्यवस्था, तसेच मान्यवरांच्या (न+) सुरक्षा बंदोबस्तासह विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत या पथकाने नागरिकांना वेगवान आणि प्रभावी पोलीस सेवा पुरवली.नोव्हेंबर महिन्यात डायल ११२ हेल्पलाइनवरून सोलापूर शहरातील १,७०७ नागरिकांनी पोलीस मदतीची मागणी केली. या प्रत्येक घटनांवर सरासरी ३७ सेकंदांत प्रतिसाद देत पोलीस पथकाने तातडीने मदत पोहोचवली. या कामगिरीमुळे सोलापूर पोलीस आयुक्तालयाचे डायल ११२ पथक महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आले आहे.

सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार आणि पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांनी डायल ११२ पथकातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी पोलीस सेवेत दाखवलेल्या तत्परतेचे कौतुक करत ही कामगिरी सोलापूर शहर पोलीस दलासाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद केले.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, प्रभारी अधिकारी खुबा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या यशस्वी कामगिरीत सपोनि योगिता कुदळे, अरुण फडके, नितीन घाटे, सादिक शेख, वर्षा चव्हाण, शैलजा बोराडे, आणि इतर पोलीस अंमलदारांचा मोलाचा वाटा होता.याशिवाय, MERS इंजिनिअर सुफीयान सय्यद आणि सिद्धार्थ माढेकर यांनी तांत्रिक मदत पुरवून कार्यक्षमता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.सोलापूर शहर पोलीस दलाच्या या यशस्वी कामगिरीमुळे डायल ११२ प्रणालीचे कार्यक्षमता आणि तत्परतेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. ही कामगिरी अन्य पोलीस आयुक्तालयांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.



श्री म्हसोबा महाराज यांच्या यात्रेचे आयोजन

राहाता । प्रतिनिधी

राहाता तालुक्यातील लोणी येथे सालाबाद प्रमाणे ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराज यांच्या यात्राचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती लोणी बुद्रुक ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या वतीने दिली.



शनिवारी १४ डिसेंबरला सकाळी मा.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते श्री म्हसोबा महाराजांचा अभिषेक होणार असून सायंकाळी चार वाजता मानाची काठीची मिरवणूक होणार आहे. शोभेच्या दारूचे आतषबाजी होणार असून रात्री तुकाराम खेडकर सह पांडुरंगमुळे यांचा लोकनाट्य तमाशा आयोजीत केला असून रविवारी सायंकाळी चार वाजता रंगारी मैदानावर जंगी कुस्तीचा हगामा होणार असून रात्री सविताराणी पुणेकर यांचा लोकनाट्य तमाशा होणार आहे.

सोमवारी दुपारी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती लोणी बुद्रुक यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली आहे.संपूर्ण यात्रा उत्सवावर सी सी टीवी कॅमेऱ्याची नजर असणार असून साध्या वेशातील पोलिसांची गस्त राहणार आहे. या यात्रेमध्ये भव्य रहाट पाळणे, महिलांसाठी विविध संसारउपयुक्त साहित्यांची भव्य दुकाने, लहान मुलांसाठी भव्य मिकीमाऊस व चक्री पाळणे, गोल पाळणे व बोटिंग ,जादूच्या प्रयोग, साहित्याची भव्य दुकान, फॅन्सी ड्रेस, चप्पल , पर्स, बांगड्या, किचन साहित्य यांचे भव्य दुकाने, भेळ, जिलेबी, रेवड्या अशा खाद्य पदार्थांचे स्टॉल असणार आहेत.

माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ.आबासाहेब पवार यांना मारहाण; गुन्हा दाखल

माळशिरस । प्रतिनिधी

माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब हरी पवार यांना त्यांच्या राहत्या घरात घुसून मारहाण करण्यात आल्याची घटना गुरुवारी (१२ डिसेंबर) सायंकाळी ७.१० वाजता घडली. पंचायत समितीतील कर्मचारी अमोल बाबासाहेब पाटील यांनी काठीने मारहाण करत खिशातील ५,००० रुपये जबरदस्तीने काढून घेतले आणि जीवे मारण्याची धमकी दिली आहे.



अमोल पाटील हे जिल्हा परिषदेत सेवेत होते, परंतु कामावरील निष्काळजीपणामुळे त्यांच्यावर कारवाई करत नोकरीवरून कमी करण्यात आले होते. या कारणामुळे पाटील यांनी संतापाच्या भरात गटविकास अधिकारी डॉ. पवार यांना धमकावत हल्ला केला. माझी नोकरी गेली आहे, जर मला परत कामावर घेतले नाही तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी देत त्यांनी हल्ला केला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या घटनेनंतर डॉ. पवार यांनी माळशिरस पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, अमोल पाटील यांच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या घटनेने पंचायत समिती व स्थानिक प्रशासनात भीतीचे वातावरण पसरले असून दोषींवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

पोस्को अंतर्गत गुन्ह्यातील आरोपीस जामीन मंजूर

गंगापूर । प्रतिनिधी

गंगापूर तालुक्यातील नवापूरवाडी येथील घटनेच्या अनुषंगाने पोस्को कायद्या अंतर्गत गंगापूर पोलिस स्टेशन येथे दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये पोलिस प्रशासनाकडून अटक झालेल्या इसमांकडून नियमित जामीन मिळण्याकरिता, ड. एस .बी. सावंत यांच्यामार्फत नियमित जामीन अर्ज जिल्हा न्यायालय व अतिरिक्त सेशन न्यायाधीश, वैजापूर यांच्याकडे दाखल करण्यात आला होता.सदरील तथाकथित गुन्ह्यात आरोपीस १८ सप्टेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली होती. सदर प्रकरण २७ नोव्हेंबर २०२४ रोजी न्यायालयासमोर सुनावणीस ठेवण्यात आले होते. सदर प्रकरणात आरोपीची बाजू मांडताना ऍड. एस . बी.सावंत यांनी माननीय न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, गुन्हा दाखल करण्यात झालेला विलंब व विलंबनाची कारणे यामध्ये साम्यता दिसून येत नाही, सदर प्रकरणात ऍड.एस.बी सावंत यांनी आरोपीतर्फे काम पाहिले. माननीय न्यायालयाने ऍड. एस .बी. सावंत यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून व दाखल कागदपत्रांच्या आधारे आरोपीस अटी व शर्ती घालून नियमित जामीन मंजूर केला.

जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना मोठा धक्का;शिबलापूरच्या सरपंचाचे पद रद्द

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील शिबलापूर गावचे सरपंच प्रमोद बोंद्रे यांचे जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी सरपंच पद आणि सदस्य पद देखील रद्द केले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



प्रमोद बोंद्रे हे कॉंग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांने समर्थक असल्यामुळे माजी मंत्री थोरात यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.याबाबत दिपक रक्टे यांच्या तक्रारीवरुन मिळालेल्या माहितीनुसार, शिबलापूर ग्रामपंचायतीच्या संरपच पदाच्या निवडणुकीत प्रमोद बोंद्रे हे निवडुन आले होते. त्यानंतर प्रमोद बोंद्रे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला असल्याचा गंभीर आरोप करत त्यांचे सदस्यत्व अपात्र करावे असा अर्ज महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम प्रमाणे विवाद जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आला होता. त्यामुळे सरपंच प्रमोद बोंद्रे यांना लेखी म्हणणे मांडण्यास सांगितले असता त्यांनी ग्रामपंचायतीने कायदेशीर प्रक्रिया पार पाडली असल्याची माहिती दिली. तर, याबाबतचा अहवाल संगमनेर पचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी दिला होता. त्या अहवालानुसार दोघांचे ही लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आले होते.

तक्रारदारांनी युक्तीवादा दरम्यान प्रमोद बोंद्रे यांचे सदस्यपद रद्द करावे अशी मागणी केली होती. त्यानुसार ग्रामपंचायत अधिनियम व तरतूदीनुसार प्रमोद बोंद्रे यांचे सरपंच पदासह सदस्य पद देखील अपात्र ठरवण्यात आले आहे. असे आदेश जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी काढल्याची माहिती मिळाली आहे.दरम्यान तक्रारदारांच्या बाजूने ड. स्वप्नील काकड यांनी काम पाहिले. तर बोंद्रे यांना या निकालाबाबत पुढील १५ दिवसांच्या आत नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे अपिल करता येणार आहे.

न्याय व्यवस्थेवर आमचा पुर्ण विश्वास असुन विभागीय आयुक्तांकडे मी दाद मागणार आहे. तसेच हार न मानता न्यायालयीन लढा आपण शेवटपर्यत लढणार असल्याची प्रतिक्रिया प्रमोद बोंद्रे यांनी दिली आहे.

जलसंधारण कामांमुळे खडकेवाके वृक्ष संपदेने बहरले

राहाता । प्रतिनिधी

तालुक्यातील खडकेवाके गावात कृषी विभाग, जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग व लोकसहभागाच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे झाल्याने गावातील पाण्याच्या स्रोतात वाढ झाली असून गावातील परिसर नैसर्गिक वृक्ष संपदेने बहरून गेला आहे.

राहाता तालुक्यातील जिरायत भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खडकेवाके या सुमारे तीन हजार लोकवस्तीच्या गावात शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून १०० हेक्टर क्षेत्रावर बांध बंधिस्तचे कामे करण्यात आली आहेत. जिल्हा परिषद पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून गावातून वाहणाऱ्या कात नदीवर ३५ लाख रूपये खर्च करून ७ बंधाऱ्यांची कामे करण्यात आली. यामुळे गावातील शेतीक्षेत्रात



असलेल्या विहीरींच्या पाणी पातळीत वाढ झाली.कात नदीवर असलेल्या जून्या साठवण तलावातील गाळ काढण्यासाठी लोकसहभागातून तलाव खोलीकरण मोहीम राबविण्यात आली. यामुळे आज गावालगत असलेल्या तलावात सुमारे २५ लाख लीटर पाण्याची साठवण झाली आहे.

गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी ही पायपीट करावी लागत होती, आज जलसंधारणाच्या झालेल्या कामांमुळे गावातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून बंद पडलेल्या हातपंपांना पाणी आले आहे. नागरिकांना पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. एकेकाळी शेतात फक्त खरीप पीके घेतली जात होती आज गावात रब्बी व नगदी पीके घेतली जात असून ऊस, सोयाबीन पीक क्षेत्रात वाढ झाली आहे.

अहमदनगरमल्लखांब वयोगासेंटरच्या खेळाडूंची शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड



अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर :नगर –आजपासून ते १३ डिसेंबर २०२४ पर्यंत उज्जैन मध्य प्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी अहमदनगर मल्लखांब व योगा सेंटरच्या एकूण ३ खेळाडूंची निवड झाली आहे.१४ वर्षाखालील गटात विहान कालीप्रसाद चंद्रात्रे व १७ वर्षाखालील गटात दिग्विजय श्रीकांत निंबाळकर व देवदत्त विशाल चोरगे यांची सीबीएससी संघात निवड झाली आहे. हे खेळाडू सुमारे ४ वर्षांपासून मल्लखांबाचा सराव करतात.काळ ते नगरहून उज्जेनला रवाना झाले , यावेळी त्यांना अनेकांनी शुभेछया दिल्या.

या खेळाडूंना संस्थेचे मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे व प्रशिक्षिका प्राजक्ता दळवी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

साकुर येथे ब्रह्मलिन माणिकगिरी महाराज व बिरोबा महाराज अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर :संगमनेर तालुक्यातील साकुर येथे ब्रह्मलिन माणिकगिरी महाराज व बिरोबा महाराज अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तनास माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी ह.भ.प दत्तगिरी महाराज यांचा सत्कार केला व त्यांच्या किर्तनाचा लाभ घेतला.

ह.भ.प. दत्तगिरी महाराज यांच्या प्रमुख किर्तनाने हा सप्ताह संपन्न झाला. या सप्ताहाची सांगता आज भक्तीमय वातावरणात व दत्तगिरी महाराज यांच्या मंत्रमुग्ध किर्तनाने झाली. या सप्ताहाची परंपरा ते पुढे घेऊन जात आहे, याचा मनापासून आनंद आहे.या सप्ताहाची प्रचिती दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हा



सप्ताह साकुरकरांनी घ्यावा अशी इच्छा मी मागील वरंवडीच्या सप्ताहात व्यक्त केली होती. सर्व साकूरकर आणि लहानु पाटील खेमनर, शंकरपाटील खेमनर व इंद्रजीत यांच्या सर्व सहकाऱ्याच्या मेहनतीने हा सप्ताह सुंदर पद्धतीने संपन्न झाला.

वारकरी संप्रदायाची थोर परंपरा शेकडो वर्षांपासून सुरू आहे, ही परंपरा पुढे नेण्याचे काम हरिनाम सप्ताहाच्या रूपाने पुढे जात असते.साकुर आणि परिसरातील सर्व जनतेचे मी मनापासून आभार मानतो कायम स्मरणात राहील असा हा अविस्मरणीय सप्ताह येथे संपन्न झाला.

महाराज, तुमच्या रूपाने वारकरी संप्रदायाची ही ज्ञानगंगा संतांच्या मुखातून आलेल्या तत्त्वज्ञानाची अशीच पुढे चालत राहावी आणि तीचे गंगारूप पुढे जाऊन मानवतेच्या सागराला मिळावी. जगामध्ये वारकरी संप्रदायाचा सर्वांना बरोबर घेण्याचा, जाती-धर्माच्या विरहित काम करणारा हा विचार जनमानसात रुजावा, ही प्रार्थना या निमित्ताने मी इथे ब्रम्हगिरी महाराज यांच्या चरणी करतो.असे माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी आपल्या वाणीतून मत व्यक्त केले

भेंडा बु येथे 'आमचं गाव,आमचा विकास'कार्यशाळा संपन्न ग्राम स्तरावर विकास आराखड्यासाठी सविस्तर मार्गदर्शन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील भेंडा बु ग्रामपंचायत सभागृहात दि. १० डिसेंबर रोजी एक दिवशीय 'आमचं गाव, आमचा विकास' कार्यशाळा आयोजित करण्यात आली. भेंडा बु, भेंडा खुर्द, सौंदाळा, देवगाव, दिघी, नजिक चिंचोली, शहापूर या गावांतील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, बचत गटाचे प्रतिनिधी आणि अंगणवाडी सेविकांना या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत नेवासा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संतोष कदम यांनी सन २०२४-२५ चा विकास आराखडा तयार करण्यासाठी बंधित व अबंधित निधीचे नियोजन, नऊ थिम्स आणि सतरा शाश्वत विकास ध्येयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या व्यासपीठावर भेंडा बु सरपंच सौ. रोहिणी नामदेव निकम, उपसरपंच सौ. संगीता नामदेव शिंदे, देवगावच्या सरपंच सौ. कांता तागड, भेंडा सोसायटीचे माजी अध्यक्ष नामदेव निकम, माजी उपसरपंच पंढरीनाथ फुलारी, ग्रामसेवक रेवन्नाथ भिसे, बचत गटाच्या प्रतिनिधी कांचन सावंत यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेच्या माध्यमातून ग्राम विकासासाठी ग्रामीण भागातील प्रतिनिधींना आवश्यक दिशा आणि मार्गदर्शन मिळाले. उपस्थितांनी या कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित केले.

महानुभाव परीषदेच्या सचिवपदी विनोद गावंडे

भद्रावती । प्रतिनिधी

अखिल भारतीय महानुभाव परीषद अंतर्गत चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा महानुभाव परीषदचे अध्यक्ष तथा श्रीकृष्ण मंदिर लोणाराचे संचालक महंत दिवाकरबाबा महानुभाव यांनी चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा महानुभाव परीषदचे सचिव म्हणून विनोद रामचंद्र गावंडे यांची नियुक्ती केलेली आहे. विनोद गावंडे हे स्थानिक विवेकानंद माध्यमिक विद्यालयात कनिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असुन ते चंद्रपूर जिल्हा खाजगी शाळा शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे जिल्हा कार्यवाहक आहेत. त्यांनी महानुभाव श्रीदत्तमंदीर साठगांव येथे श्रीदत्त जयंती यात्रा



महोत्सवानिमित्त विविध धार्मीक कार्यक्रमाबरोबरच प्रवचन, किर्तन, अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, अहिंसा, आत्महत्या, महीला मेळावा, श्रीमद्भगवतगिता परीक्षा, बालसंस्कार शिबीर, स्वच्छता अभियान, सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी जयंती आदी कार्यक्रम घेवून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्याचप्रमाणे संतमहंताचा आदर ठेवून महानुभाव पंथाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य आजही सुरू असुन सामाजीक कार्यात नेहमी सहभागी असतात. त्यांच्या या नियुक्तीबद्दल महंत न्यायबांसबाबा, महंत माहूरकरबाबा, महंत एकोव्यासबाबा, महंत मुधोव्यासबाबा, महंत परसराजबाबा, महंत वंकीराजबाबा आदीनी अभिनंदन केले.

चांदेकसारे सहकारी संस्थेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

कोपरगाव तालुक्यात चांदेकसारे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या नूतन कार्यालय व गोडाऊन इमारतीचा उद्घाटन समारंभ दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाला. परमपूज्य गुरुवर्य श्री. रमेशगिरीजी महाराज (मठाधिपती, राष्ट्रसंत श्री जनार्दनस्वामी महाराज आश्रम ट्रस्ट, कोपरगाव) यांच्या शुभहस्ते हा समारंभ पार पडला.कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास भिमाजी होन (माजी चेअरमन) होते, तर सहाय्यक निबंधक नामदेवजी ठोंबळ यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली. १९५५ साली स्थापन झालेल्या या संस्थेचे संस्थापक धर्मादादा होन यांच्यासह कै. भगिरथ दादा होन, कै. विष्णू भागवत होन यांचे योगदान उल्लेखनीय आहे.संस्थेचे वैशिष्ट्य



म्हणजे १९६२ पासून निवडणुका बिनविरोध होत आहेत. सुमारे दोन कोटी रुपयांच्या ठेवींसह सभासदांचा संस्थेवर विश्वास कायम आहे.

यावेळी विवेक कोल्हे यांनी संस्थेच्या प्रगतीस शुभेच्छा दिल्या. परमपूज्य रमेशगिरीजी महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राजेश परजणे, सुभाष होन, विठ्ठल होन, संजय शिंदे यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

मा.आ.जयवंतराव जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त रावगाव येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

सोलापूर । प्रतिनिधी

माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त रावगाव येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब बुधवंत यांच्या संकल्पनेतून आयोजित या शिबिरात सुमारे ३०० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तसेच औषधोपचारांसह मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. शुक्रवार, १३ डिसेंबर रोजी हनुमान मंदिर सभामंडपात पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन कृ.ऊ. बाजार समितीचे माजी संचालक दादासाहेब जाधव, माजी सरपंच विलास बरडे, भाऊसाहेब फुंदे, तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.



शिबिरात डॉ. पुंडे (साडे आरोग्य उपकेंद्र), डॉ. नागरगोजे (मुळव्याध तज्ञ), डॉ. नितीन निंबाळकर (अस्थिरोग तज्ञ), डॉ. अपेक्षा शिंदे, डॉ. डोळस आणि पुण्याच्या डॉ. एच. व्ही. देसाई हॉस्पिटलच्या टीमने नागरिकांची तपासणी व उपचार केले. यामध्ये रक्तदाब, शुगर, रक्त तपासणी, मुळव्याध, गुडघे व मणका तपासणी यांसह साथीच्या आजारांवर मोफत उपचार करण्यात आले. या विधायक उपक्रमामुळे सामान्य नागरिकांना आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून या शिबिराचे सर्वत्र कौतुक होत आहे. समाजासाठी पथदर्शक ठरलेल्या या उपक्रमामुळे रावगाव परिसरात एक आदर्श निर्माण झाला आहे.

नाशिक-पुणे महामार्गावरील उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू

नाशिक। प्रतिनिधी

पुणे महामार्गावरील संगमनेर तालुक्यातील इंजिनिअरिंग कॉलेजजवळील उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू असून, यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटी सदस्य आणि माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नांतून या प्रकल्पासाठी ३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

घुलेवाडी येथील अपघात प्रवण क्षेत्रात असलेल्या या पुलाच्या कामासाठी थोरात यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. सुरुवातीला प्रलंबित राहिलेले काम सप्टेंबर २०२४ मध्ये पुन्हा गतीने सुरू करण्यात आले. या पुलाच्या कामामुळे घुलेवाडी, आदर्श नगर, सायखिंडी, मालदाड आणि



अन्य ग्रामस्थांसाठी तसेच महामार्गावरील वाहतुकीसाठी मोठी सोय होणार आहे.

स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पाच्या वेगाने सुरू असलेल्या कामाबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे अभिनंदन केले आहे.

निमगाव हवेलीच्या सरपंच पदावरून लखन जगताप यांची हकालपट्टी

सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा तालुक्यातील निमगाव हवेली ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच लखन अरुण जगताप यांचे सरपंचपद सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशानुसार रद्द करण्यात आले आहे. २०१९-२० मध्ये निमगाव हवेली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक सतीश नीळ यांच्या गटाने बहुमत मिळवून विजय संपादित केला होता. मात्र, लखन जगताप यांनी बागल गटाचा राजीनामा देऊन सरपंच पदावर दावा केला होता. त्यानंतर सतीश नीळ यांनी लखन जगताप यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचा आरोपकरत जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करून जगताप यांचे सरपंचपद रद्द करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणात सतीश नीळ यांची बाजू ड. घोडके यांनी तर लखन जगताप यांची बाजू ड. मराठे यांनी मांडली. आता सरपंचपदावरून लखन जगताप यांची हकालपट्टी झाल्याने गावच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

चिमुकल्यावर हल्ला करणारा बिबट्या जेरबंद





अहिल्यानगर । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे पाच वर्षीय मुलावर हल्ला करणारा बिबट्या अखेर वन विभागाच्या प्रयत्नांमुळे जेरबंद झालाआहे.घटनास्थळी लावलेल्या पिंजऱ्यात दोन दिवसांनंतर बिबट्याला पकडण्यात आले. जगताप वस्तीवरील शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला. त्याला डिग्रस नर्सरी येथे हलवण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून ताहाराबाद आणि परिसरात बिबट्याने जनावरांवर हल्ले करत भीतीचं वातावरण निर्माण केलं होतं. शेतकरी शेतात जाण्याचे धाडस करत नव्हते.बिबट्या पकडल्याने ग्रामस्थांनी मोठा दिलासा मिळवला आहे. ही कारवाईवनपरिक्षेत्र अधिकारी युवराज पाचरणे,वनपाल भाऊसाहेब शेंडगे,वनरक्षक शंकर खेमनर आणि समाधान चव्हाण यांच्या पथकाने केली.

मोहन गायकवाड यांची प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी फेरनिवड

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी पत्रकार मोहन गायकवाड यांची सार्वनुमते फेर निवड करण्यात आली आहे.



प्रेस क्लबचे संस्थापक अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हि निवड करण्यात आली.

या बैठकीत पत्रकारांसाठी विविध उपक्रम विषयी चर्चा,विविध विषयांवरील पत्रकार परिषदांचे आयोजन आणि पत्रकार परिषदांसाठीचे नियोजन,शहरातील पत्रकारांचे प्रलंबीत प्रश्न,पत्रकारांच्या संरक्षण कायद्याचा पाठपुरावा, गेल्या अनेक वर्षा पासून प्रलंबीत असलेल्या पत्रकार वसाहतीचा प्रश्न या बाबत चर्चा करण्यात आली. पत्रकार कैलास शिंदे यांनी प्रास्ताविक करून संघाच्या कामकाजाची माहिती सांगितली. यावेळी नूतन निवड करण्यात आलेली प्रेस क्लब कार्यकारणी पुढील प्रमाणे उपाध्यक्षपदी कैलास शिंदे व नाना पवार, कार्याध्यक्षपदी सुधीर चव्हाण,सरचिटणीसपदी अशोक डहाळे, सहसचिवपदी सुहास पठाडे, खजिनदारपदी रमेश शिंदे, सह खजिनदारपदी शाम मापारी, संघटकपदी मकरंद देशपांडे, शंकर नाबदे सह संघटकपदी यांची निवड करण्यात आली. तर पवन गरुड, अभिषेक गाडेकर यांनामीडिया प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली.

अध्यक्ष मोहन गायकवाड यांनी मागील कालावधीतील उपक्रमातील माहिती दिली. तसेच यावेळी त्यांचा मागील वर्षातील चांगल्या कामकाजाबद्दल प्रेस क्लबच्या वतीने अभिनंदनचा ठराव घेण्यात आला.त्यास सर्वानुमते संमती देण्यात आली.

ईव्हीएम हटाव देश बचाव च्या स्वाक्षरी अभियानास शेवगाव शहरात उस्फुर्तपणे प्रतिसाद

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऍड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व मतदार संघात ईव्हीएम विरोधात मतदारांची स्वाक्षरी मोहीम दि ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने शेवगाव येथे शहर व तालुक्यातील अनेक स्वाभिमानी मतदारांनी ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीमेत उपस्थिति दर्शवली. शेवगाव शहरातील क्रांती चौक येथे वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा किसन चव्हाण यांनी प्रथम स्वाक्षरी करून तालुक्यातील स्वाक्षरी अभियानास सुरुवात झाली. शेवगाव तालुका अध्यक्ष शेख प्यारेलालभाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाक्षरी



मोहीम राबविण्यात आली आहे.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा किसन चव्हाण यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. ते म्हणाले, महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीचा महायुतीच्या बाजूने लागलेला निकाल हा अनपेक्षित आणि चमत्कारिक लागलेला असून हा निकाल भाजपने केंद्रातील सत्तेचा गैरवापर करून ईव्हीएम या यंत्राच्या माध्यमातून लावून घेतलेला आहे, अशा निकालाने देशातील संविधान आणि लोकशाही धोक्यात असून तिचा गळा घोटण्याचाच प्रकार भाजप सत्तेचा गैरवापर करून करत आहे. त्यामुळे ईव्हीएम हटाव देश आणि देश बचाव यासाठी यापुढील सर्व निवडणुका या बॅलेट पेपर घेण्यात याव्या यासाठी वंचित बहुजन आघाडी सर्व विरोधी पक्षांना सोबत घेऊन रस्त्यावरची लढाई लढणार आहे.

यावेळी वंचित चे अरुण पाटील झांबरे, ऑगस्टीन गजभीव, लक्ष्मण मोरे, शेख सलीम जिलाणी, गणेश बोरुडे, संभाजी कुसळकर, भिमा गायकवाड, सुरेश खंडागळे, नितीन गुंजाळ, पप्पू गर्जे, संजय चव्हाण, ज्ञानेश्वर पिटेकर, सुंदर आल्हाट, प्रमोद गजभीव, भिमराज लक्ष्मण फडके, पठाण महेमुद याकुबभाई, शेषराव आव्हाड, सतिश शेषराव ठोंबे, दिलिप वाघमारे व ईतर सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रस्त्यावरील खड्ड्यांविरोधात जागरण गोंधळ आंदोलन

नेवासा । प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्ड्यांच्या विरोधात मी नेवासकराच्या वतीने जागरण गोंधळ घालून अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला समर्पण संघटनेचे अध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी पाठिंबा दर्शवला.

डॉ. घुले यांनी नेवासा शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य विभागातील अडचणी आणि तीर्थक्षेत्र विकासातील समस्यांवर आवाज उठवत प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध व्यक्त केला. त्यांनी अधिकाऱ्यांना सतर्क करण्याचे आवाहन करत नेवासा शहराच्या हितासाठी कार्यरत राहण्याची ग्वाही दिली.

रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वारंवार होणारे अपघात आणि भाविकांच्या होणाऱ्या त्रासाबद्दल संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. संघटनेचे शांताराम गायके यांनी इशारा



दिला की, खड्डे बुजवण्याची आणि नगरपंचायतीची फुटलेली पाणीपुरवठा पाइपलाइन दुरुस्त न केल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल. आंदोलनाच्या ठिकाणी नेवासा नगरपंचायतीचे अधिकारी म्हस्के यांनी भेट देत आंदोलकांचे निवेदन स्वीकारले आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन खड्डे बुजवण्याचे काम लवकरच सुरू करण्याची हमी दिली. या आंदोलनात विकास चव्हाण, संतोष राजगिरे, संतोष चव्हाण, अनिल सोनवणे, रामदास ईरले, गणेश चांगले यांसह अनेक स्थानिक नागरिक सहभागी झाले. लक्ष्मण गोंधळी आणि त्यांच्या ताफ्याने आयोजित जागरण गोंधळाचे सादरीकरण आंदोलनाचे प्रमुख आकर्षण ठरले. शहरातील नागरिकांनी या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून पाठिंबा दिला

कौडगाव जांब ग्रामपंचायतीला पूर्णवेळ ग्रामसेवक नसल्या मुळे विकासकामे खुंटले-ग्रा.पं.सदस्य बाबासाहेब धिवर

अहिल्यानगर । प्रतिनिधी

नगर तालुक्यातील कौडगाव जांब ग्रामपंचायतीला आठवड्यातून दोन दिवस ग्रामसेवक असल्यामुळे गावाची व ग्रामस्थांची विकास कामे आडून पडत आहेत. गावाला पूर्ण वेळ ग्रामसेवक मिळावा असे निवेदन ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांना निवेदन दिले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर म्हणाले की, गावाला आठवड्यातून दोनच दिवस ग्रामसेवक येत असल्याने गावातील अनेक विकास कामे होत नाही.तसेच ग्रामस्थांचे अनेक कामांचा वेळ लागत असल्याने त्यांचे कामे पुर्ण होत नाहीत. तसेच आठवड्यातून दोन ग्रामसेवक येत, परंतु विविध शासकीय कामांमुळे त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे कौडगाव जांब ग्रामपंचायतीला पुर्ण वेळ ग्रामसेवक मिळावा, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असे सांगितले. यावेळी पंचायत समितीचे गटविकास



अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी सांगितले की, गावाला पुर्णवेळ ग्रामसेवक देण्याचा प्रयत्न लवकरात लवकर करु. तसेच गावातील अनेक समस्या सोडविण्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले.

परभणीतील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचा मोर्चा; पोलीस व तहसीलदारांना निवेदन सुपूर्द

पुलगाव । प्रतिनिधी

परभणी येथे घडलेल्या संविधान विटंबना प्रकरणाच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने पुलगाव येथे मोर्चा काढून सरकारविरोधात तीव्र रोष व्यक्त केला. मोर्चात सहभागी कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या रक्षणासाठी घोषणा दिल्या. मोर्चा पुलगाव पोलीस ठाण्यावर जाऊन पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर तहसील कार्यालयावर मोर्चा नेऊन तहसीलदार यांनाही निवेदन देत संविधानाची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाईची मागणी



करण्यात आली.

यावेळी काँग्रेस अध्यक्ष सुनील ब्राह्मणकर, राजू लोहकरे, राष्ट्रवादीचे श्याम देशमुख, माजी शिवसेना जिल्हाप्रमुख बाळा शहागडकर यांसह अनेक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजू लोहकरे यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले, महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर लगेचच अशा घटना घडणे लाजिरवाणी बाब आहे. जर सरकार दलित व शोषित जनतेच्या हितासाठी कार्य करायला हयगय करत असेल, तर आंबेडकरवादी बांधव रस्त्यावर उतरण्याशिवाय राहणार नाही. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये अश्विन शाह, मुन्ना शुक्ला, शब्बीर पठाण, बंटी फुलझेले, रमेश सावरकर, डॉ. मिलिंद ठोंबरे, विजय भटकर आदींचा समावेश होता.महाविकास आघाडीच्या या आंदोलनामुळे संविधानाच्या रक्षणासाठी सरकारवर दबाव वाढला असून, घटनेतील दोषींवर लवकरात लवकर कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय दिव्यांग टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडिया, महाराष्ट्र दिव्यांग क्रिकेट असोसिएशन, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि स्पेशल ऑलिंपिक भारत महाराष्ट्र अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय दिव्यांग टी-२० क्रिकेट स्पर्धेचे अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात होते.या स्पर्धेच्या ठिकाणी माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी भेट दिली आणि सर्वांशी संवाद साधून त्यांच्या व परिवाराच्या वतीने शुभेच्छा दिल्या.यावेळी संघर्ष व संकटांना तोंड देत इथपर्यंत पोहोचणाऱ्या सर्व खेळाडूंना उत्तम खेळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विखे पाटील परिवाराने दिव्यांग खेळाडूंची जबाबदारी घेतली असून सर्व खेळाडूंना खेळात नावलौकिक करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल



असे स्पष्ट केले. सदरील टी-२० स्पर्धेत चार राज्यातील संघांनी सहभाग घेतला असून इथून पुढच्या काळातही जास्तीत जास्त राज्यातील संघ अहिल्यानगर येथे येतील असे आश्वासित केले.याप्रसंगी श्री. निखिलजी वारे, श्री. धनंजय जाधव, श्री. आंधळे जी तसेच क्रिकेट प्रेमी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोव्यात जननायक भारतरत्न करपुरी ठाकूर जन्मशताब्दी मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

अखिल गोमंतक नाभिक समाज, ओबीसी बहुजन संघ आणि समस्त नाभिक समाजाच्या वतीने गोव्यात जननायक भारतरत्न करपुरी ठाकूर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाला करपुरी ठाकूर यांचे सुपुत्र डॉ. वीरेंद्र ठाकूर, समाज कल्याण मंत्री सुभाष फळदेसाई, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सयाजी झुंजारे, बामसेफचे कुमार काळे, विकास मदने, मारुती टिकुगडे यांसह गोव्यातील नाभिक व ओबीसी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.





कार्यक्रमात नाभिक समाज आणि ओबीसी समाजाने आगामी काळात राजकीय आणि सामाजिक हक्कांसाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले. महामंडळाचे अध्यक्ष सयाजी झुंजारे यांनी शासनाच्या योजनांचा समाजासाठी प्रभावीपणे उपयोग करण्याची गरज व्यक्त केली. समाज कल्याण मंत्री सुभाष फळदेसाई यांनी गोव्यातील नाभिक समाजाला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही, अशी ग्वाही दिली. बामसेफचे कुमार काळे यांनी जातवार जनगणनेची मागणी व समाजाच्या समस्यांवर भाष्य केले. प्रमुख पाहुणे डॉ. वीरेंद्र ठाकूर यांनी करपुरी ठाकूर यांच्या सामाजिक योगदानाची व त्यांच्या राजकीय विचारधारेची माहिती दिली.या कार्यक्रमाचे नियोजन गोवा राज्य अध्यक्षा डॉ. सुजाता रायकर, प्रा. संजय गोवेकर, लाडू सुर्लकर, प्रमोद तारापूरकर, आणि मोहनदास करेकर यांनी केले. कार्यक्रमात समाजातील ऐक्य व संघटनाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

कोजबी येथील सरस्वती विद्यालयात विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप

तळोधी (बा) । प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील कोजबी (चक) येथील सरस्वती विद्यालयात वर्ग ५ ते १०वीतील विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. सध्या सुरू असलेल्या थंडीच्या मोसमामुळे विद्यार्थ्यांना उबदार कपड्यांची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला.



जनकल्याण बहुउद्देशीय शिक्षण संस्था नवरगाव द्वारा संचालित सरस्वती विद्यालयाच्या सचिव मनीषा बारापात्रे यांचे चिरंजीव इंजि. उत्कर्ष बारापात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी मनीषा बारापात्रे, इंजि. संकेत बारापात्रे, मुख्याध्यापक दीपक बोकडे, तसेच शिक्षक सुरेश बोरकर, मधुसूदन नागपूरे, घृष्णेश्वर बोरकर, आणि विलास तोडासे उपस्थित होते. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार सहायक शिक्षक चंद्रशेखर गायकवाड यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा अंतरिम उत्तरसुची प्रसिध्द

संकेतस्थळावर आक्षेप नोंदणीची मुदत १६ डिसेंबरपर्यंत

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत १० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.१ व पेपर क्र.२ ची अंतरिम तात्पुरती उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या परीक्षेसाठी पेपर क्र. १ व पेपर क्र.२ बाबत प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी किंवा आक्षेप असल्यास ते परिषदेकडे १६ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत पाठवता येतील, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

सदर आक्षेप किंवा त्रुटी बाबतचे निवेदन http://mahatet.in या संकेतस्थळावर परीक्षार्थ्यांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आक्षेप नोंदणी या लिंकद्वारे परिषदेकडे पाठवता येतील. आक्षेपाबाबत लेखी निवेदन समक्ष, टपालाने किंवा ईमेलद्वारे पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. विहित मुदतीत ऑनलाईन रित्या प्राप्त झालेल्या आक्षेपाचा विचार करून विषय तज्ञांच्या अभिप्रायानुसार अंतिम उत्तरसूची यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.



कास पठारवरील जय मल्हार हॉटेल मध्ये रेव्ह पार्टीदरम्यान बारबाला नाचवून धिंगाणा;पाच जणांवर गुन्हा दाखल

सातारा । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील कास पठार येथील जय मल्हार हॉटेलमध्ये झालेल्या रेव्ह पार्टीदरम्यान बारबाला नाचवताना वादाच्या अनुषंगाने दोन जणांना मारहाण करण्यात आली.

घटना ऐकीव येथील एका हॉटेलमध्ये रविवारी रात्री घडली. हॉटेलमध्ये बारबाला नाचवत असताना, एक जण दारू पिऊन दुसऱ्याच्या डोक्यात बिअरच्या बाटलीने फोडली. त्यानंतर जाब विचारण्यासाठी प्रतिक दळवी, हे जखमी धिरज शेळके यांच्या साथीने वाद काढत असताना, संशयितांनी प्रतिकच्या डोक्यात देखील बिअरची बाटली फोडली आणि त्याच्यावरही मारहाण केली.

घटनेनंतर, धिरज शेळके यांनी मेढा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आणि पोलिसांनी पाच संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला. संशयितांची नावे श्रेयस श्रीधर भोसले, रोहन जाधव, सोन्या जाधव, अमर पवार, समीर सलीम कच्छी अशी आहेत.पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेलमध्ये पार्टीचे आयोजन गोपनीयतेत करण्यात आले होते, परंतु भांडण झाल्यानंतर हे उघड झाले. पुढील तपास पोलीस सपोनि ताटे करीत आहेत. याबाबत पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी अधिक माहिती आणि अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

भविष्यवेधी प्रशिक्षण कार्यक्रमात ५९ शिक्षकांचा सहभाग

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूर आणि चिमूर आदिवासी प्रकल्पांतर्गत येणा-या सर्व शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिकविणा-या शिक्षकांसाठी भविष्यवेधी प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास विभागातर्फे शिक्षकांचे सक्षमीकरण हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला असून यात ५९ शिक्षकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहायक प्रकल्प अधिकारी राजीव बोंगीरवार, धोटकर, गिरडकर, चव्हाण, श्रीरामे, कुळसंगे यांच्यासह शिक्षकांना मार्गदर्शन करणारे काकासाहेब नागरे, उमेश आडे, गोविंद पेदेवाड, विकास गेडाम उपस्थित होते. सदर प्रशिक्षणात जिवती, देवाडा, मंगी, रुपापेठ, मरेगाव, बोर्डा, देवई, चंदनखेडा, जांभुळघाट, कोसंबी, पाटण, चिंधीचक या शाळेतील ५९ शिक्षकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.यावेळी प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार म्हणाले, आजच्या बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये शिक्षकांची भुमिका अधिकाधिक महत्वाची आणि भविष्य घडविणारी ठरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या भविष्यवेधी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे शिक्षकांना आधुनिक शिक्षण पध्दती, नवतंत्रज्ञान, अध्यापन कौशल्यांच्या माध्यमातून अधिक सक्षम बनविणे, हा आहे. विद्यार्थी स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी शिक्षक हे एक स्तंभ आहेत. त्यामुळे अशा प्रशिक्षणाद्वारे शिक्षकांची क्षमता वाढविणे, भविष्यात अशा उपक्रमांना अधिक प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे, यासाठी आपले प्रयत्न सुरू राहतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.या विषयावर झाले प्रशिक्षण आणि चर्चा :- सत्र आधुनिक शिक्षण तंत्रज्ञानाचा वापर, नवीन उपक्रम आणि शैक्षणिक पध्दती, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक धोरणे, खेळ आणि सृजनशील कृतींचे आयोजन, समूह चर्चा आणि अनुभवांची देवाणघेवाण, नेतृत्व कौशल्य विकास व भविष्यातील शैक्षणिक गर्जांची तयारी, अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन, कामाचे टप्पे आणि प्राधान्यक्रम, अध्ययन स्तर, अध्ययन निष्पती व २१ व्या शतकातील कौशल्य, शिकण्याच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा उपयोग, विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान, प्रशिक्षणोत्तर सहायक प्रणाली, मुलांना स्वत: शिकण्यास प्रेरीत करणे आदी विषयांवर प्रशिक्षण आणि चर्चासत्र घेण्यात आले.दुस-या टप्प्यातील उर्वरीत शिक्षकांचे प्रशिक्षण ११ ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असल्याचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी कळविले आहे.

परिवारातील लोकांनी मुलांसमोर मोबाईल चा वापर टाळणे म्हणजे शाश्वत विधार्थी घडणे-डॉ.मंगेश गुलवाडे

राणी राजकुंवर प्राथमिक शाळा चंद्रपूर येथे वार्षिक उत्सव व राणी राजकुंवर भगिनी समाज संस्थेचा वर्धापन दिन साजरा

चंद्रपूर । प्रतिनिधी

राणी राजकुंवर प्राथमिक शाळा, चंद्रपूर येथे दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम व राणी राजकुंवर भगिनी समाज संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अहिल्याबाई होळकर जन्म त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम हा अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित होता.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. मंगेश गुलवाडे (अध्यक्ष, अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी वर्ष समिती, चंद्रपूर तसेच मा.जिल्हाध्यक्ष, भाजपा, चंद्रपूर) होते. प्रमुख वक्त्या म्हणून अश्विनी सोनवणे (शिक्षणाधिकारी प्रा. वि.चंद्रपूर) या उपस्थित होत्या.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित नृत्य-नाटिका, गीत, व नाट्यप्रयोग सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. प्रमुख पाहुण्यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरव करत, सामाजिक विकासासाठी त्यांच्या विचारांचा उपयोग करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले डॉ. मंगेश गुलवाडे यांनी आपल्या भाषणात आजच्या गतिमान युगात गुणवंत विद्यार्थी घडविता येतो त्या करिता परिवारातील लोकांनी मुलांसमोर मोबाईल चा वापर टाळणे म्हणजे शाश्वत विधार्थी घडणे हे ब्रीद पालकांना सांगितले, व विद्यार्थ्यांनी



लिहिलेल्या हस्त लिखित नवं ऊर्जा या विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. प्रमुख वक्त्या म्हणून लाभलेल्या सौ. अश्विनी सोनवणे (शिक्षणाधिकारी प्रा. वि.चंद्रपूर)यांनी आपल्या भाषणात विशेष बाब म्हणून कुटुंबातील एक तरी व्यक्तींनी आपल्या अपत्या सोबत वाचन करावे असे सांगितले. जल्लोष चिमुकल्यांचा या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे निमंत्रण पत्रिका ही विद्यार्थ्यांनी स्वतः हस्तलिखित स्वरूपाची करून मान्यवरांना पाठविली .कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक वैशाली दुर्योधन , राणी राजकुवर भगिनी समाज चंद्रपूरच्या अध्यक्ष प्राजक्ता भालेकर, उपाध्यक्ष माधवी भागवत,सचिव मुग्धा पाठक, शिक्षकवृंद, पालक आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन रागिनी नंदुरकर व स्नेहा मिसार यांनी केले तर आभार सरिता सोनकुसरे यांनी मानले.हा वर्धापन दिन व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम केले.

१६ डिसेंबर रोजी महिला लोकशाही दिन



चंद्रपूर । प्रतिनिधी

प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी जिल्हा स्तरावर व चवथ्या सोमवारी तालुका स्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. डिसेंबर महिन्याचा तिसरा सोमवार १६ डिसेंबर रोजी असल्यामुळे या दिवशी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

महिला लोकशाही दिनी न्याय प्रविष्ठ प्रकरणे, सेवाविषयक, आस्थापना बाबी विषयक व विहित अर्जात नसलेली प्रकरणे स्वीकारण्यात येणार नाही. तरी ज्या महिलांचे वरील बाबी सोडून तक्रार / निवेद वैयक्तिक स्वरुपात असेल, अशा तक्रारी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसांपूर्वी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयात दोन प्रतीत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनास प्राप्त तक्रार संबंधित विभागाला पाठवून अर्जाचा निपटारा करण्यात येईल, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी कळविले आहे.

विदर्भातील बांबू हस्तकला वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन

चंद्रपूर । प्रतिनिधी

विदर्भातील बांबू हस्तकला वस्तूंना जागतिक बाजारपेठ मिळवण्यासाठी एक महत्त्वाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. चीचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, महानिर्देशक विदेश व्यापार कार्यालय नागपूर (डी. जी. एफ. टी.) आणि हस्तकला निर्यात प्रवर्तन परिषद (ई. पी.स.एच.) या संस्थांनी विदर्भातील बांबू उद्योजक व कारागीरांसाठी वन अकादमी येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेत विदर्भातील विविध जिल्ह्यातून ८० बांबू उद्योजक व कारागीर सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी नागपूर डी. जी. एफ. टी. च्या सहाय्यक निदेशक स्नेहल ढोके, वन प्रबोधनीच्या अपर संचालक मनिषा भिंगे, मुख्य डाक कार्यालयाचे विकास अधिकारी सुधीर आकोटकर, बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखा प्रबंधक सागर खापणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी काठोळे, पंधरे, बी.आर.टी.सी.चे वनपरिक्षेत्र अधिकारी ए.डी. मल्लेलवार यांची उपस्थिती होती.

स्नेहल ढोके यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, भारताचा हस्तकला वस्तूच्या व्यापारात ४० टक्के वाटा आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बांबू हस्तकला वस्तूची मागणी खूप आहे. डी. जी. एफ. टी. कार्यालय बांबू वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करत आहे.

मनिषा भिंगे यांनी सांगितले की, विदर्भातील बांबू वस्तूंची विक्री आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात व्हावी, त्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला पाहिजे. तज्ञ मार्गदर्शक क्रिष्णा चंदर यांनी ई. पी.स.एच. विभागाच्या योजनांची माहिती दिली. सुधीर आकोटकर यांनी डाक विभागाच्या हस्तशिल्प व्यापारासाठी सुलभ योजनांची माहिती दिली.

बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखा प्रबंधक सागर खापणे यांनी बांबू उद्योजक व कारागीरांसाठी बँकेच्या अर्थसहाय्य योजनांची माहिती दिली, तर अमेझॉन ग्लोबलचे यश दवे यांनी ऑनलाइन विक्रीसाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सांगितली.कार्यशाळेचे आयोजन अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. एस. रेड्डी आणि बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे संचालक अशोक खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी बी.आर. टी.सी.चे आभार मानले. कार्यशाळेचे संचालन योगिता साठवणे यांनी केले, तर आभार ए.डी. मल्लेलवार यांनी मानले.

